दैनिक अहमदनगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक

# राष्ट्र सह्याद्री



## अनंत चतुर्दशीच्या हार्दिक शुभेच्छा!

### सुट्टीची सूचना

अनंत चतुर्दशीनिमित्त दैनिक राष्ट्रसह्याद्री कार्यालयास सुट्टी असल्यामुळे बुधवार दि.१८ सप्टेंबर २०२४ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. गुरुवार दि.१९ सप्टेंबर २०२४ रोजीचा अंक नेहमीप्रमाणे प्रकाशित होईल. याची हितचिंतक, जाहिरातदार, वाचक, विक्रेते यांनी नोंद घ्यावी...

– संपादक

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ५ वे ● अंक ३१३ वा ● मंगळवार, १७ सप्टेंबर २०२४ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## काय म्हणता..!

के.बी.पाटील



कमाल आहे! तुमच्या मुलाकडे एवढी अलिशान महागडी गाडी असूनही त्याने अद्याप एकदाही दारू पिऊन अपघात केला नाही?

# मनोज जरांगे पाटलांचे आजपासून पुन्हा उपोषण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**जालना** : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आजपासून (१७ सप्टेंबर) पुन्हा आमरण उपोषणाला बसणार आहेत. अंतरवाली सराटी येथे सोमवारी रात्री १२ वाजेपासून त्यांचे उपोषण सुरू होणार आहे. सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करावी, हैदराबाद गॅझेटसह सातारा आणि बॉम्बे गॅझेट लागू करावं, अशा मागण्या मनोज जरांगे यांनी केल्या आहेत.

ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ते उपोषण करणार असल्याने शिंदे सरकारचे चांगलेच टेन्शन वाढणार आहे.

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावं यासाठी मनोज जरांगे पाटील हे गेल्या एक वर्षापासून आंदोलन करीत आहेत. आतापर्यंत त्यांनी ५ वेळा आमरण उपोषण केले आहे. परंतु अद्याप मराठा समाजाला अद्याप ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळालेलं नाही.

मागील पाच उपोषणात सरकारने जरांगे यांची मनधरणी करत उपोषण सोडवण्याची विनंती केली होती. सरकारच्या विनंतीला मान देऊन जरांगे यांनी वेळोवेळी उपोषण देखील सोडले. परंतु त्यांच्या मागण्या अद्यापही मान्य झालेल्या नाही. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण न देता राज्य सरकारने विशेष अधिवेशन देऊन स्वतंत्र आरक्षण दिले. मात्र हे आरक्षण कोर्टात टिकणार नाही. त्यामुळे सगेसोयरेंची अधिसूचना काढून मराठ्यांना सरसकट ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्या, अशी मागणी जरांगे यांनी केली आहे. त्यांची ही मागणी सरकारने अद्याप मान्य केलेली नाही. त्यामुळे मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक पवित्रा घेत पुन्हा उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात घोंगडी बैठका घेतल्यानंतर मनोज जरांगे हे आज मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनापासून सलग सहाव्यांदा उपोषण सुरू करणार आहे. त्यांच्या उपोषणामुळे सरकारची कोंडी होणार आहे. कारण, थोड्याच दिवसांत राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. मराठ्यांच्या आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना **(पान ४ वर)**

### सकारात्मक रोडमॅप तयार : फडणवीस

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल धनगर समाजाच्या नेत्यांसोबत अत्यंत महत्वाची बैठक घेतली आहे. त्यांच्यासोबत झालेल्या चर्चेनंतर आरक्षणासंदर्भात अतिशय सकारात्मक रोडमॅप बनवण्यात आला आहे', तसंच मुख्यमंत्र्यांनी योग्य आणि सकारात्मक भूमिका घेतली आहे, आम्ही त्या दिशेने आम्ही पुढे जात आहे.असे फडणवीस यांनी म्हंटले आहे.

# शिक्षक भरतीच्या दुसऱ्या टप्प्यात ३० हजार पदे भरणार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : राज्यातील सरकारी, अनुदानित शाळांमध्ये रिक्त असलेल्या शिक्षकांच्या पदभरतीचा दुसरा टप्पा लवकरच सुरू होणार आहे. ही पदभरती पवित्र पोर्टलच्या माध्यमातून गुणवत्तेच्या आधारावर केली जाणार आहे.

शालेय शिक्षण विभागाकडून राज्यातील विविध शाळांमध्ये सुमारे ५० हजार शिक्षकांची पदे भरण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर पहिल्या टप्प्यात २० हजार आणि दुसऱ्या टप्प्यात ३० हजार पदे भरली जाणार आहेत. यासाठी सविस्तर जाहिरात काढून पदभरती केली जाणार आहे. त्यासाठी सरकारी, अनुदानित शाळांमध्ये बिंदुनामावलीनुसार रिक्त पदे आणि गट व विषयनिहाय रिक्त पदांची माहिती तयार ठेवण्याच्या सूचना शालेय शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिल्या आहेत. त्यानुसार पवित्र पोर्टलवर जाहिरात देण्यासाठी शैक्षणिक संस्थांना कळविले जाणार आहे.

एसईबीसीसाठी राखीव जागा

पहिल्या टप्प्यात राज्यातील एसईबीसी प्रवर्गासाठी काही जागा राखीव ठेवून पदभरती करण्यात आली होती. यावेळी दुसऱ्या टप्प्यांत एसईबीसीसाठी खास राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत. या जागांच्या संख्येबाबत शैक्षणिक संस्थांकडून माहितीही घेण्यात आली आहे. त्यानुसार पदभरतीच्या जाहिरातीमध्ये या प्रवर्गाचा उल्लेख केला जाणार आहे.

अपात्र ठरलेली पदे भरणार

यापूर्वी भरतीप्रक्रियेत सहभागी झालेल्या; परंतु अपात्र ठरलेल्या, गैरहजर राहिलेल्या किंवा रुजू न झालेल्या उमेदवारांमुळे ज्या जागा रिक्त राहिल्या आहेत, त्या पवित्र पोर्टलच्या माध्यमातून गुणवत्तेनुसार भरली जाणार आहेत. त्यासाठी शाळांनुसार अपात्र ठरलेल्या अथवा रिक्त राहिलेल्या पदांचा भरतीप्रक्रियेत विचार केला जाणार आहे.

### राज्यातील शाळा २५ तारखेला बंद राहणार

शिक्षक संचमान्यतेचा १५ मार्च २०२४ चा आणि कंत्राटी शिक्षक भरतीचा ५ सप्टेंबर २०२४ चा शासन निर्णय वाडीवस्तीवरील विद्यार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने दोन्ही शासन निर्णय रद्द करावेत. या मागणीसाठी राज्यातील सर्व प्राथमिक शाळा २५ सप्टेंबर रोजी बंद ठेवून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्णय पुणे येथे नुकत्याच झालेल्या राज्यातील सर्व शिक्षक संघटनांच्या बैठकीत घेण्यात आला.

## महत्वाचे...

### नगर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश

**शिर्डी** : अहमदनगर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये १९ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### परदेशी पर्यटकांकडून हिट अँड रन;एकाचा मृत्यू

**नाशिक** : परदेशी पर्यटकांनी नाशकात हिट अँड रन केल्याचा प्रकार समोर आलाय. परदेशी महिलेने रिक्षा चालवत एका दुचाकी स्वाराला धडक दिली आहे. यामध्ये एकाचा मृत्यू झालाय. नाशकातील नारायण गाव येथे ही घटना घडली आहे. दरम्यान, दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्यानंतर विदेशी पर्यटकांनी पळ काढला होता. मात्र, सध्या विदेशी पर्यटक पोलिसांच्या देखरेखेखाली आहेत. अधिकची माहिती अशी की, परदेशी पर्यटकांनी धडक दिल्याने दुचाकीस्वार असलेल्या नारायण गावच्या बाळासाहेब डेरे यांचा मृत्यू झालाय. दुचाकी स्वाराचा मृत्यू झाल्यानंतर घाबरलेले परदेशी पर्यटक नारायण गाव येथून नाशिकला पळाले आहेत. सध्या चारही पर्यटक नारायण गाव पोलिसांच्या निगरानीत आहेत. परदेशी पर्यटकांनमध्ये तीन पुरुष दोन महिलांचा समावेश आहे. नारायण गाव पोलिसांकडून संशयित पर्यटकांना नोटीस बजावण्यात आली आहे.

## आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणस्थळी धनगर बांधवाकडून विष प्राशन

**सोलापूर** : राज्यात आरक्षणाचा मुद्दा चांगलाच तापला असून एकीकडे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंची उद्यापासून पुन्हा उपोषण सुरू होणार आहे तर दुसरीकडे धनगर समाजही एसटी प्रवर्गातील आरक्षण समावेशासाठी आंदोलन करत आहे. धनगर समाजाकडून विविध ठिकाणी उपोषण करण्यात येत असून पंढरपुरी येथे गेल्या आठ दिवसांपासून समाज बांधवांची उपोषण सुरू आहे. आज सायंकाळी उपोषण स्थळीच ईश्वर वठार येथील संजय चौगुले यांनी विष प्राशन केल्याची धक्कादायक घटना घडली.

पंढरपूर येथे सहा जिल्ह्यातील सहा प्रतिनिधी धनगर समाजाची एसटी आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी यासाठी उपोषणास बसले आहेत आठव्या दिवशी ही तोडगा निघाला नसल्याने समाज आक्रमक झाला आहे मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत समितीची नेमणूक करण्याचे पुन्हा आश्वासन मिळाल्याने उपोषणकर्त्यांनी आंदोलनस्थळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करून निषेध व्यक्त केला जात आहे.

त्यातच धनगर समाजाच्या आमरण उपोषणाचा आज आठवा दिवस असून सरकार बरोबर शी बोलणे फिसकटल्याच्या निरशातून उपोषणाच्या ठिकाणी ईश्वर वठार येथील संजय चौगुले या तरुणाने विष प्राशन केले. त्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## गांधींची जीभ छाटेल त्याला ११ लाखांचं बक्षीस

### आ. गायकवाड यांची जीभ घसरली



**नाशिक** : राहुल गांधी यांची जीभ छाटेल त्याला ११ लाखांचं बक्षीस देणार, असं खळबळजनक वक्तव्य शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केले आहे. शिवसेनेचे आ. संजय गायकवाड यांनी केलेल्या धक्कादायक वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात मोठा गदारोळ माजला आहे.

बुलढाण्याचे शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड म्हणाले की, जो राहुल गांधीची जीभ छाटेल, त्याला ११ लाखांचं बक्षीस देणार आहे. राहुल गांधी यांना मागासवर्गीय, आदिवासींसह इतरांचे शंभर टक्के आरक्षण संपवायचं आहे. आरक्षण संपवण्याची भाषा करून त्यांच्या मनातील ओठावर आलं आहे.

राहुल गांधी हे जे शब्द बोलले की, आम्हाला आरक्षण संपवायचंय. माझं आवाहन आहे की, जो राहुल गांधींची जीभ छाटेल, त्याला ११ लाखांचं बक्षीस मी माझ्या वतीने देईल.

महाराष्ट्र आणि देशात आरक्षणाची आग लागली आहे. त्यातच मागासलेल्या जातींना इतर समाजांच्या बरोबरीने उभे करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षण दिले. असे असताना काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी विदेशात जाऊन आमच्या देशातले आरक्षण मला संपवायचंय, असं वक्तव्य केले. काँग्रेसचा खरा चेहरा आणि त्यांच्या पोटातील मळमळ त्यांनी ओकून दाखवली. संविधान धोक्यात आहे, संविधानात आपले आरक्षण संपवणार आहे, असा फेक नरेटिव्ह पसरवला आणि दलित समाजाची मते घेतली. आणि आज आरक्षण संपवण्याची भाषा करतायत, असे संजय गायकवाड म्हणाले आहेत.

## शेवगाव-पाथर्डी मतदारसंघात इच्छुकांची रांग

### हर्षदा काकडे यांची विधानसभेच्या मैदानात उडी!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर** : लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. विधानसभा निवडणूक जवळ येत आहे तशी इच्छुक उमेदवारांची संख्या देखील वाढत आहे. अहमदनगरच्या शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदारसंघामध्ये इच्छुक उमेदवारांची संख्या वाढत आहे. गोपीनाथ मुंडे यांच्या खंद्या समर्थक आणि माजी जिल्हा परिषद सदस्य हर्षदा काकडे यांनी कुठल्याही परिस्थितीत विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी दाखवली आहे.

हर्षदा काकडे यांच्या भूमिकेने भाजपच्या विद्यमान आमदार मोनिका राजळे यांना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. एकेकाळी भाजपच्या जिल्हा परिषद सदस्य राहिलेल्या हर्षदा काकडे यांना २०१४ आणि २०१९ या दोन्ही निवडणुकांमध्ये भाजपकडून उमेदवारी मिळाली नाही, मात्र आता मिळेल त्या पक्षाकडून उमेदवारी करायची किंवा अपक्ष निवडणूक लढवायची असा निश्चय त्यांनी केला आहे. हर्षदा काकडे आणि त्यांचे पती विद्याधर काकडे मागील ४० वर्षांपासून या मतदारसंघात जिल्हा परिषद सदस्य आहेत. यासोबतच शैक्षणिक संस्था आणि सामाजिक कामामुळे या दाम्पत्याची मतदारसंघात चांगली ओळखही आहे. हे सगळं असलं तरी शेवगाव पाथर्डी मतदारसंघात सध्या भाजपच्या मोनिका राजळे आमदार आहेत तर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून प्रताप ढाकणे निवडणुकीची तयारी करत आहेत.



## ट्रक चालकाचा पश्चिम बंगालमध्ये मारहाणीत मृत्यू; मयत टाकळीभानचा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : तालुक्यातील ट्रक चालकाचा पश्चिम बंगालच्या खडकपूर येथे अपघाताच्या कारणावरुन जमावाकडून झालेल्या जबर मारहाणीत मुत्यू झाला आहे. तीन दिवसानंतर मृतदेह टाकळीभान येथे आणल्यानंतर अत्यंत शोकाकुल वातावणात अंत्यसंस्कार पार पडले.येथील गरीब कुटुंबातील शाम शंकर गणकवार (वय २९) हा टाकळीभान येथून ट्रक क्रमांक (एम.एच १७ बी.झेड. ४५८२) मध्ये कांदा भरुन पश्चिम बंगाल येथील खडकपूर येथे जात असताना त्याच्या कडून अपघात झाला होता.मात्र, तो घटनास्थळावरुन गाडी सोडून पळून न जाता अपघातातील जखमी झालेल्यांना मानवतेच्या भावनेने मदत करत होता. मात्र, अपघातस्थळी जमा झालेल्या जमावाकडून त्याला जबर मारहाण झाली. जमावाच्या जबरी मारामुळे त्याचा जागेवरच मुत्यू झाला. त्याला वाचवण्यासाठी आलेल्या पोलिसांनाही जमावाकडून मारहाण झाल्याने सुमारे दहा पोलिस कर्मचारीही जखमी झाले.गाडीला ठोकायचे आणि पळून जायचे असे प्रकार नेहमी होत असतात. पण आता हे प्रकार चालणार नाहीत. हिट अँड रन केसमध्ये आता कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर केले आहे. त्यात अपघात करून फरार होणाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे.

**(पान ४ वर)**



## मोटारसायकली चोरणारा अट्टल गुन्हेगार पकडला ; २७ मोटारसायकली हस्तगत

**नाशिक** : जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागातून मोटारसायकल चोऱ्याचे प्रमाण वाढले असून नाशिक शहरातून एकूण २७ मोटारीसायकली चोरी झाल्या आहेत. या प्रकरणी वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत. मात्र चोऱ्याबाबत नाशिक पोलीस आयुक्तालयाने तपासाचे त्वरित आदेश गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त प्रशांत बच्छाव यांना दिल्याने त्याच्या सुचनेनुसार गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त संदिप मिटके तपासाचे आदेश मिळाल्यानंतर या मिटके यांनी चोरी प्रकरणाचा सखोल केला असता चोरीच्या मोटारीसायकली जळगाव जिल्हयात विक्री होत असल्याची गोपनीय माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाली. जळगाव येथे एक इसम दुचाकी विक्री करण्यासाठी येणार असल्याचे कळल्यावर गुन्हे शाखेचे संदिप मिटके यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक मुक्तेश्वर लाड मंगेश जगझाप रविंद्र दिघे भगवान जाधव यांच्यासह पथक जळगाव येथे रवाना झाले. तेथील जळगाव येथील भागात विक्री करत असल्या ठिकाणी आरोपी किशोर संजय चौधरी (वय ३० रा तरवाडे ता पारोळा जि जळगाव) यास रंगेहात पकडले.त्यास नाशिक येथे आणण्यात आले त्यांच्या कडून नाशिक शहरातून वेगवेगळ्या ठिकाणावरून चोरी **(पान ४ वर)**

## सरकारने कांद्यावरचे निर्यात मूल्य घटवले, पण सिस्टीमच अपडेट नाही

### ३०० कंटेनर अडकले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात मूल्य हटवले आहेत. तसेच निर्यात शुल्क ४० टक्क्यांवरुन २० टक्के करण्याचा निर्णय दोन दिवसांपूर्वी घेतला. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे शेतकरी आणि कांदा व्यापाऱ्यांकडून स्वागत करण्यात आले. परंतु निर्यात मूल्य रद्द झाल्यानंतर देखील कांदा व्यापारी आणि निर्यातदारांच्या अडचणी मात्र काही केल्या कमी होताना दिसत नाही. केंद्र सरकारकडून निर्णय झाल्यानंतर देखील सिस्टीम अपडेट न झाल्याने लाखो टन कांदा बॉर्डरवर (सीमेवर) अडकला आहे. बांगलादेश बॉर्डर वर १०० ट्रक तर मुंबई पोर्टलवर देखील ३०० कंटेनर अडकून पडले आहे.

केंद्र सरकारने अधिसूचना काढत कांद्यावरील निर्यात मूल्य हटवले. त्यामुळे कांदा निर्यातीला चालना मिळणार आहे. परंतु व्यापारी आणि निर्यातदारांचे प्रचंड हाल होत आहेत. कारण सिस्टीम अपडेट नसल्याने कागदपत्र तयार करण्यास अडचण येत आहे. तसेच जहाज निघून गेल्यास लाखो टन कांदा सडून जाण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. केंद्रीय पातळीवरून हस्तक्षेप करण्याची कांदा निर्यातदारांनी मागणी केली आहे.

कांद्यावरील निर्यात शुल्क ४० टक्यांवरून २०टक्यांवर आणले तरी अद्याप याबाबत जेएनपीटी बंदरात या विषयी काही अपडेट नाही. २० टक्के शुल्क केले असले तरी जेएनपीटी बंदर प्रशासनाने त्यांच्या सिस्टममध्ये सुधारणा न केल्याने निर्यात थांबली आहे. निर्यात होत नसल्याने नाशिकमध्येच कांद्याच्या गाड्या अडकून पडल्या आहेत. यामुळे कांदा निर्यातीवर मोठा परिणाम झाला आहे.

कांदा निर्यात मूल्य आणि निर्यात शुल्कमध्ये बदल केल्यानंतर कांदा निर्यातीला वेग येणार आहे. श्रीलंका, बांग्लादेश, गल्फ कंट्री, मलेशिया या देशातून कांद्याच्या मागणीला सुरुवात झाली आहे. या निर्णयानंतर नाशिक जिल्ह्यात ४०० ते ५०० रुपयांनी कांद्याचे दर देखील वाढले आहेत. कांदा निर्यात देखील वेगाने सुरू होण्याची शक्यता वर्तवण्याच येत होती. परंतु सिस्टीम अपडेट न झाल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

### निर्यातबंदी संदर्भात यापूर्वी आलेल्या अधिसूचना...

- १९ ऑगस्ट २०२३ कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लावण्यात आले होते...
- २८ ऑक्टोबर २०२३ ला कांद्यावर ८०० डॉलर प्रति मेट्रिक टन निर्यातमूल्य लावले होते..
- ७ डिसेंबर २०२३ निर्यातबंदी करण्यात आली होती...
- ४ मे निर्यातबंदी उठवली मात्र निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लावण्यात आले
- होते आणि ५५० डॉलर किमान निर्यात मूल्य लावण्यात आले..
- १३ सप्टेंबरला कांदा निर्यात वरील ५५० डॉलर निर्यातमूल्य रद्द..



# श्री गणेशाची विसर्जन मिरवणूक ठरली राहुरीकरांचे आकर्षण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्याच्या इतिहासात प्रथमच टाळ मृदंगाच्या गजरात व जयहरी चा जयघोष करत लाडक्या गणरायाची विसर्जन मिरवणूक पारंपारिक पद्धतीने काढण्यात आली. पोलीस निरीक्षक संजय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस लाईन गणेश मंडळाची गणपती विसर्जन मिरवणूक काल सायंकाळी काढण्यात येऊन मुर्ती विसर्जन करण्यात आले.

गणपती विसर्जन मिरवणूक म्हटले कि, गणपती बाप्पा समोर डिजेच्या तालावर कर्ण कर्कश आवाजात अश्लील गाणे लाऊन धिंगाणा घालणारे तरुण आपल्या डोळ्यासमोर येतात. परंतू राहुरी तालुक्याच्या इतिहासात प्रथमच टाळ मृदंगाच्या गजरात व जयहरी चा जयघोष करत मिरवणूक काढण्यात आली. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी अनेक दिवसांपासून राहुरी येथे डिजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यासाठी प्रयत्न केले. त्यात त्यांना अपयश आले मात्र दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस लाईन गणेश मंडळात सत्यनारायण पुजा करुन अन्नदान करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी चार वाजता गणेश मुर्तीची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.

यामध्ये ढोल ताशा सारखे पारंपरिक वाद्य वाजविण्यात आले. तसेच टाळ मृदुंगाच्या गजरात विसर्जन मार्गाने मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकी दरम्यान बाल गोपालांनी साजर केलेला रिंगण सोहळा नेत्रदीपक ठरला. यावेळी जयहरीच्या जयघोष व टाळ मृदुंगाच्या गजराने परिसर दणाणून गेला होता. शहरातील नेते व व्यापाऱ्यांनी मिरवणूकीचे स्वागत करून पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांचा सत्कार करुन त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच महिला व व्यापाऱ्यांनी टाळ व मृदुंगाच्या तालावर ठेका धरला. तसेच पोलिस कर्मचाऱ्यांनी गुलाची उधळण करत फुगडी खेळून मिरवणूकीत सहभाग नोंदवीला.

राहुरी शहरात प्रथमच टाळ मृदंगाच्या गजरात व जयहरीचा जयघोष करत लाडक्या गणरायाची विसर्जन मिरवणूक पारंपारिक पद्धतीने काढण्यात आल्याचे पाहून शहरातील नागरिक भारावून गेले होते. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून एक नवा इतिहास रचला.

पोलिस निरीक्षक संजय ठेंगे व राहुरी पोलिस ठाण्याचा आदर्श घेऊन तालुक्यातील सर्वच गणेश मंडळांनी पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करावा. असे मत यावेळी माजी नगराध्यक्ष अनिल कासार, माजी उप नगराध्यक्ष दादापाटील सोनवणे यांनी व्यक्त केले.







छाया : राजेंद्र परदेशी

# कुकाणा प्राथमिक शाळेत पालक मेळावा संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा :** ता.नेवासा येथे बदलापूर घटनेनंतर प्रशासनाच्या आदेशानंतर सुरक्षा समितीची स्थापना तसेच विविध मुद्यावर जिल्हा परिषद शाळेत पालक मेळावा संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्ष पदी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष देविदास गरड हे होते. या प्रसंगी सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबद तसेच नविन २ वर्गखोल्या मुलांच्या बैठक व्यवस्थे साठी बँचेस, डिजिटल शिक्षण प्रणाली, नवीन इन्ट्रॅक्टटिव्ह बोर्ड, मागणीबाबत ग्रामपंचायतला मागणी करण्याचा ठराव करण्यात आला यावेळी उपस्थित ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच व सदस्यमंडळाने शालेय व्यवस्थापन समितीने केलेली मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याने पालक व व्यवस्थापन समितीच्या वतीने ग्रामपंचायतचे आभार व्यक्त केले. यावेळी मुलांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित झाला आसुन समाजात वेगवेगळ्या अनपेक्षित घटना घडत आहेत त्यासाठी शालेय सुरक्षा कमिटीची स्थापना करण्यात आली असून. मुलांना वाहतुकीचे नियम, सूचनांचे पालन, स्वच्छतेचे महत्व,

शालेय प्रसाधन गृहाची देखभाल दुरूस्ती, सकस आहार , नविन परिपत्रका बद्दल सकारात्मक चर्चा करण्यात आली पालकांनीही आध्ययनाबाबतीत महत्त्वाच्या सूचना मांडल्या यावेळी महिला पालकांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. सर्व बाबींनवर सकारात्मक चर्चा करून सर्व सूचनांचं पालन करण्याचे आश्वासन मुख्याध्यापिका विजया झावरे यांनी दील .लोकसहभागातून शाळेसाठी विविध उपक्रम घेण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन समितीचे अध्यक्ष देविदास गरड यांनी केले. यावेळी व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष सोमनाथ कचरे उपाध्यक्ष महेश सदावर्ते अरून फोलाने, सागर गोरडे समीर शेख शरद कावरे, भगवान कचरे,आणासाहेब गायकवाड, प्रमोद दरंदले, डॉ. पूजा भागवत,शरदराव कचरे, वैशाली पंजाबराव देशमुख, सुप्रिया प्रशांत उंडे , मयुरी हांडे, कैलास लोंढे यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अशोक राठोड यांनी केले तर आभार बाळासाहेब डाके यांनी आभार मानले.



कुकाणा जिल्हा प्राथमिक शाळेत पालक मेळाव्याप्रसंगी उपस्थित पालक वर्ग व व्यवस्थापन समिती पदाधिकारी (छाया – सोपान भगत)

# प्रवरा कन्या विद्यामंदिरचा संघ विभागीय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गणोरे :** अनिल गोर्डे युथ फाऊंडेशन व आई संटुआई प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सवानिमित्त महिलांसाठी होम मिनिस्टर,खेळ रंगला पैठणींचा हा कार्यक्रम फिल्म कलाकार राजेंद्र शिंदे पुणेकर यांच्या अधिपत्याखाली हजारो महिलांच्या उपस्थितीत नुकताच पार पडला.

खेळ रंगला पैठणींचा या कार्यक्रमात लहान लहान मुलींपासून तरुण तरुणींबरोबरच आजीबाईंनी देखील सहभाग नोंदविला.या खेळांमध्ये तब्बल दोनशेहून अधिक महिलांनी भाग घेत या मनमोहक कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमात पैठणीसाठी प्रथम विजेत्या सोनाली घोटेकर, द्वितीय विजेत्या प्रतिक्षा पवार, तृतीय विजेत्या नीलम गोर्डे या महिला भाग्यवान ठरल्या. तसेच तन्वी हासे, सुनिता वाकचौरे, प्राची गोर्डे, शोभा गोर्डे, योगिता तोरमल या पाच महिला विजेत्यांना चांदीचे नाणे देऊन गौरविण्यात आले.असे एकूण आठ बक्षीसे देण्यात आली तसेच सहभाग घेतलेल्या सर्वच महिलांना देखील मंडळाच्या वतीने विशेष बक्षीस देऊन गौरविण्यात आले. तसेच पुरुषांसाठी गावचा पोलीस पाटील कोण होणार ही स्पर्धा राबविण्यात आली.या चुरशीच्या लढतीमध्ये दौलत धोंडीबा महाले हे या कार्यक्रमाचे पोलीस पाटील ठरले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ अनिल गोर्डे युथ फाऊंडेशन तसेच आई संटुआई प्रतिष्ठानचे सदस्य तसेच अध्यक्षांसमवेत पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.




गणोरे – पिंपळगांव निपाणी येथे होम मिनिस्टर या कार्यक्रमात पैठणीसाठी विजेत्या महिलांना चांदीचे नाणे व पैठणी देऊन गौरव करताना. छाय : जगन्नाथ आहेर

# वडाळा बहिरोबा सोसायटीच्या अध्यक्षपदी जामकर, उपाध्यक्षपदी घाडगे





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा :** नेवासा तालुक्यातील वडाळा बहिरोबा सोसायटीच्या अध्यक्षपदी भाऊसाहेब जामकर तर उपाध्यक्षपदी मच्छिन्द्र घाडगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

वडाळा बहिरोबा सोसायटीच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांनी राजीनामा दिल्याने निवडणूक निर्णय अधिकारी डी.टी. महाजन यांनी नुतन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी सभा बोलावली होती, यावेळी अध्यक्षपदासाठी भाऊसाहेब जामकर तर उपाध्यक्ष पदासाठी मच्छिंद्र घाडगे यांचा एकमेव अर्ज आल्याने दोघांचीही बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी मुळा कारखान्याचे संचालक व सोसायटीचे मार्गदर्शक भाऊसाहेब पाटील मोटे यांनी नूतन अध्यक्ष व उपाध्यक्षांचे संस्थेचे सर्व संचालक तसेच सचिव संभाजी चव्हाण यांचे स्वागत केले. यावेळी ड चांगदेव मोटे, माजी उपसरपंच राहुल मोटे, माजी अध्यक्ष प्रकाश मोटे, संदीप मोटे, माजी उपाध्यक्ष बापूसाहेब मोटे संचालक अशोकराव जेम्स, संजय मोटे, निलेश मोटे, सुखदेव साळवे, विलास मोटे, अनिल मोटे, बाबासाहेब मोटे, मिरा मोटे, शुभांगी पतंगे, तज्ञ् संचालक बाळासाहेब मोटे, राजेंद्र मोटे,प्रभाकर मोटे, ईश्वर पतंगे आदी सभासद उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंध कार्यालयाचे डी. टी. महाजन यांनी काम पाहिले तर त्यांना संस्थेचे सचिव संभाजी चव्हाण यांनी सहकार्य केले.

# वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून शिंगाडवाडी शाळेस पुस्तके भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** रांजणगाव गणपती गावचे युवा उद्योजक श्री कुमार महाराज नाणेकर यांनी वाढदिवसासाठी होणाऱ्या अनावश्यक खर्चास फाटा देऊन शिंगाडवाडी शाळेतील सर्व मुलांना दैनंदिन उपयोगी अशी पुस्तके भेट देऊन एक आदर्श युवा पिढी समोर ठेवला आहे.शाळेतील विद्यार्थ्यां बरोबर संवादही यावेळी त्यांनी साधला. सध्याच्या धावत्या युगात अशा प्रकारचे अनावश्यक खर्च करून युवा पिढी साध्या लाखो रुपये खर्च करत असताना नाणेकर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसमोर ही एक नवा आदर्श ठेवला आहे. यावेळी कार्यक्रमासाठी विकास फंड, सचिन कुटे, दादा बांदल, लहानू गोरे उपसरपंच, अरविंद शिंगाडे ग्रा प सदस्य, विठ्ठल चोरामले व्यवस्थापन समिती अध्यक्ष, तुषार शेळके, शिवाजी टाव्हरे, श्रावण शेळके, आदीनाथ जगदाळे अमोल चोरामले, दत्तात्रय नाणेकर आदी मान्यवर उपस्थित होते. सूर्यकांत बढे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर मुख्याध्यापक अशोक पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

# प्रवरा फार्मसी महाविद्यालयात रक्तदान शिबीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा ग्रामीण औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय लोणी येथे गणपती मोहोत्सवाचे औचित्य साधून रक्तदान शिबिर संपन्न झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय भवर यांनी दिली. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत प्रवरा मेडिकल ट्रस्ट लोणी रक्तपेढी यांच्या सहकार्याने सदर शिबिर घेण्यात आले.या शिबिरामध्ये एकूण १२० विद्यार्थी व शिक्षक यांनी सहभाग घेत रक्तदान केले.

शिबिरा वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भवर यांनी रक्तदानाविषयी महत्त्व विशद केले. रक्तदान घेण्यापूर्वी रक्तदात्यांची पूर्व तपासणी करण्यात आली व रक्तदान झाल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. सदर शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. मयूर भोसले, प्रा.शुभम म्हस्के व प्रवरा मेडिकल ट्रस्ट यांनी विशेष परिश्रम घेतले.

# रामपूर ग्रामपंचायतच्या वतीने नारळाच्या वृक्षांचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चितळी :** ग्रामपंचायत रामपूरवाडी यांच्या वतीने पंचक्रोशीत असलेल्या ६१५ कुटुंबांस प्रत्येकी एक नारळाचे वृक्ष लागवड करण्यासाठी दिले आहे.त्यांची लागवड करून जोपासना करण्याची जवाबदारी संबधीत कुटूंबाची राहणार आहे.

महाराष्ट्र शासन यांच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद,नगर यांच्या मार्गदर्शनाखाली १५ व्या वित्तआयोगाच्या निधीच्या माध्यामातून व ग्रामपंचायत विकासकामांच्या आराखडय़ातून नुकतीच 'एक कुटुंब एक झाड' ही संकल्पना रामपूरवाडी (ता. राहाता) येथे राबविण्यात आली यावेळी सरपंच संदीप सुरडकर उपसरपंच मंदाताई काळे यांच्या हस्ते गावातील प्रत्येक कुटुंबास नारळाचे वृक्ष हस्तांतरित करून योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी कार्याध्यक्ष बबनराव काळे, ग्रामसेवक प्रमोद कानडे, ग्रा.कर्मचारी किरण म्हसे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब भोरकडे, अरुण काळे विजय गवळी, मुकुंदा अभंग,अशोक म्हसे,चंद्रभान भोरकडे,बाळासाहेब शिनगर,आदी मान्यवर उपस्थित होते.



# ज्ञानेश्वरी जयंतीनिमित्त ३ मिनिटात करणार ज्ञानेश्वरी पारायण : हभप रामेश्वर महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** ग्रंथराज ज्ञानेश्वरीमध्ये एकूण ९ हजार ३३ ओव्या आहेत,सुमारे तीन हजार भाविक हे ज्ञानेश्वरी पारायणाला बसतील त्यात प्रत्येकाने ठरवून दिलेल्या पाच ओव्यांचे वाचन केल्यास अवघ्या तीन मिनिटात ज्ञानेश्वरी वाचनाने ज्ञानेश्वरी जयंती ही ग्रंथराज ज्ञानेश्वरी रचनास्थान असलेल्या नेवासा नगरीतील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर प्रांगणात दि.२३ सप्टेंबर रोजी साजरी करण्यात येणार असल्याचे भेंडा येथील ज्ञानेश्वरी उपासक माऊली सूत हभप श्री रामेश्वर महाराज कंठाळे यांनी सांगितले.

अधिक माहिती देतांना हभप कंठाळे महाराज म्हणाले की भाद्रपद वद्य ६ सोमवार दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी ज्ञानेश्वरी जयंती येत आहे.मागील वर्षी ज्याना १० किंवा ५ ओव्या मिळाल्या आहेत त्यांनी आपल्या जवळच्या व्यक्तीना त्यातील १-१ ओवी प्रत्येकी ९ व्यक्तीना द्यावी व स्वतःसाठी १ ओवी ठेवावी. जर आपणाकडून हे शक्य होत नसेल तर २-२ ओवी ४ व्यक्तीना देऊन २ ओवी स्वतः साठी ठेवावी.



जर हेही शक्य होत नसेल तर ५ ओवी एका व्यक्तीला देऊन स्वतः कडे ५ ओव्या ठेवाव्यात. ज्यांना आपण ओवी दिलेली आहे. त्याची माहिती आपणाकडे ठेवावी, आमच्याकडे फक्त आपली माहिती असेल,प्रत्येक ओवीला एक दिवा लावायाचा आहे असे कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले असल्याचे माऊली सूत रामेश्वर महाराज कंठाळे महाराज यांनी सांगितले.

ज्या ज्ञानेश्वरी वाचकांना ज्ञानेश्वरीच्या ओव्या मिळालेल्या नाहीत,अशा वाचकांनी आपणास हवा तो अध्याय व ओव्या निवडून निवडलेल्या ओव्या इतके दिवे सोबत घेऊन यावे,निवडलेल्या अध्यायामध्ये बसावे, वेळापत्रक खालील प्रमाणे- दुपारी ३ ते ६ ज्ञानेश्वरी ग्रंथाची भव्य मिरवणूक. सायंकाळी ६ ते ६.३० ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण होऊन दीपोत्सव साजरा होऊन ज्ञानेश्वरीच्या आरतीने व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता प्रसाद वाटपाने करण्यात येणार आहे.तीन मिनिटात होणाऱ्या संपूर्ण ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणासाठी भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन हभप कंठाळे महाराज यांनी केले आहे.

# प्रशासकीय इमारतीत दिव्यांगांना सुविधा उपलब्ध करु : जिल्हाधिकारी सालीमठ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** दिव्यांग व्यक्तींना निवडणूक कालावधीत व इतर कार्यालयीन कामकाज करण्यासाठी दिव्यांग कायदा अधिनियम २०१६ नुसार विनाअडथळा सुलभतेने ये जा करण्यासाठी लिफ्ट अथवा तळमजल्यावर कार्यालय असणे आवश्यक आहे.कृपया त्याची पुर्तता अहमदनगर जिल्ह्यात प्रत्येक शासकीय इमारतीमध्ये होणे आवश्यक आहे.अशी मागणी दिव्यांग विभाग नोडल अधिकारी व अपंग सामाजिक विकास संस्थेचे चेअरमन संजय साळवे यांनी अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांच्याकडे प्रशासकीय इमारतीमध्ये आयोजित लोकशाही चर्चा कार्यक्रमात केली.

निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय,२२० श्रीरामपूर (अ जा) विधानसभा सभा मतदार संघ मतदार नोंदणी,मतदारांचे अधिकार व जबाबदारी यांवर लोकशाही चर्चा कार्यक्रम नवीन प्रशासकीय इमारतीमध्ये आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमासाठी प्रांताधिकारी किरण सावंत, तहसीलदार मिलिंद कुमार वाघ,नायब तहसीलदार राजेंद्र वाघचौरे,डॉ. संजय अनारसे, मूकबधिर विद्यालय मुख्याध्यापक संतोष जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमासाठी अपंग सामाजिक विकास संस्थेच्या सचिव वर्षा गायकवाड,आसान दिव्यांग संघटनेच्या खजिनदार सौ.साधना चुडिवाल,उपाध्यक्ष सुनिल कानडे,जिल्हाध्यक्ष विश्वास काळे,दत्तनगर शाखा उपाध्यक्ष महेंद्र दिवे,सलीम खाटीक यांसह श्रीरामपूर शहर व तालुक्यातील सामाजिक राजकीय,व्यापारी असोसिएशन पत्रकार प्रतिनीधी, तृतीय पंथीय प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रांताधिकारी किरण सावंत यांनी केले.तर सूत्रसंचालन गणेश पिंगळे यांनी केले.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

# विकासाला आडवे येणाऱ्यांना विधानसभेत जागा दाखवा : आ. काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव शहराचा पाणी प्रश्न सुटला तर राजकारण कशावर करायचे? याची चिंता असणाऱ्यांनी आपली राजकीय दुकानदारी संपुष्टात येवू नये एवढ्या एका गोष्टीसाठी ५ नंबर साठवण तलाव होवू नये यासाठी न्यायालयात आठ याचिका दाखल केल्या. अफवा पसरविल्या, अडथळे आणले मात्र मी दिलेला शब्द पूर्ण करून ५ नंबर साठवण तलावाचे काम पूर्ण दाखविले आहे. पाणी प्रश्न सुटला आता कोपरगावला जिल्ह्यात नव्हे तर राज्यात नंबर एक करायचे आहे. त्यासाठी यापुढे कोपरगावच्या विकासाला आडवे येणाऱ्यांना विधानसभा निवडणुकीत गाडून टाका असा घणाघात आ. आशुतोष काळे यांनी केला.

कोपरगाव शहराच्या ५ नंबर साठवण तलावाच्या जलपूजन प्रसंगी आ. काळे बोलत होते. ५ नंबर साठवण तलावाच्या पाण्याचे विधिवत जलपूजन आ. आशुतोष काळे व त्यांच्या पत्नी जिल्हा बँकेच्या माजी संचालिका चैतालीताई काळे यांच्या हस्ते व सर्व जाती धर्माचे साधू-संत, धर्मगुरू व हजारो कोपरगावकरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

तत्पूर्वी के.जे.एस. कॉलेजपासून येसगाव येथील ५ नं.साठवण तलावापर्यंत भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. यावेळी आ.आशुतोष काळे यांनी शहरातील विविध महापुरुषांच्या स्मारकांना पुष्पहार आर्पण करून अभिवादन केले. कोपरगावकरांनी चौका-चौकात जेसीबीच्या सहाय्याने आ. आशुतोष काळे यांच्यावर पुष्पवृष्टी केली तर ठिकठिकाणी सुवासिनींनी आ.आशुतोष काळे यांचे औक्षण करून त्यांना आशीर्वाद दिले.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, ५ नं. साठवण तलावाचे काम सुरु केल्यापासून

## ५ नंबर साठवण तलावाचे जलपूजन



> उपोषणाचा संघर्ष मोठा होता त्यावेळी एक पत्नी म्हणून मी काहीशी घाबरले होते. परंतु आ.आशुतोष काळे आपल्या निर्णयावर ठाम राहून ज्यावेळी कोपरगावकरांची तहान भागेल त्याचवेळी घरी येणार असल्याचे सांगितले. २०१९ ला आमदार झाल्यानंतर माजी.आ.अशोकदादांनी सांगितले की, तुला आता साठवण तलाव पूर्ण करावाच लागेल.अशोकदादांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी आपला संघर्ष पुढे सुरु ठेवून आलेल्या अनंत अडथळ्यांवर मात करून कोपरगावकरांच्या आशीर्वादाने त्यांनी साठवण तलावाचे काम अविरतपणे पुढे घेवून जात कोपरगावकर ज्या दिवसाची वाट पाहत होते तो दिवस उगवला. कोपरगावकरांसाठी हा अविस्मरणीय क्षण आहे. साठवण तलाव काही नाही असे काही लोकांनी खोटे सांगितले. परंतु कोपरगावच्या महिला हुशार आहेत त्यांनी साठवण तलावाच्या काँक्रीटिकरण कामाच्या वेळी हजारो महिलांनी स्वत: उपस्थित राहून साठवण तलावाचे सुरु असलेले काम पाहिले. त्यावेळी कुणाचे डोंगळे कुठेही निघू द्या, पण आमचा तलाव झालाच पाहिजे हि महिलांची भावना ५ नंबर साठवण तलावाचे अनन्यसाधारण महत्व अधोरेखित करते.
> **-सौ.चैतालीताई काळे.**

ज्यांना राजकीय दुकानदारी बंद होण्याची भीती होती त्यांच्याकडून शेवटपर्यंत अडचणी आणण्यात आल्या मात्र या अडचणींवर मात करून दिलेला शब्द पूर्ण केला. साठवण तलावाचे मटेरिअल समृद्धी महामार्गासाठी घेवून जाण्याचे ठरले असतांना त्यात झालेले राजकारण कोपरगावकर जाणून आहेत. मात्र निवडून आल्यावर दोनच महिन्यात काम सुरु करून कोपरगाव नगरपरिषदेचे जवळपास आठ कोटी रुपये वाचविले. तांत्रिक मान्यता घेतल्यानंतर प्रशासकीय मंजुरी मिळवून १३१.२४ कोटी निधी आणला. पहिला हफ्ता आल्यानंतर कोपरगाव नगरपरिषदेकडे १५ टक्के लोकवर्गणी भरण्याची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे त्यावेळी विरोधकांनी साठवण तलावाचे काम पूर्ण होणार नाही अशा अफवा पसरविल्या. त्यावर मार्ग काढतांना उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या सहकार्याने १५ टक्के रक्कम माफ करून आणले व कोपरगावकरांचे जवळपास २० कोटी रुपये वाचविले. साठवण तलावासाठी पाणी आरक्षित करण्यासाठी कोपरगाव नगरपरिषदेकडे असलेली थकीत पाणी पट्टी भरण्यासाठी हफ्ते पाडून घेत पाणी आरक्षित केल्यानंतर शेतीचे पाणी कमी होईल अशी अफवा पसरवून न्यायालयात वेगवेगळ्या नावाने आठ याचिका दाखल करण्यात आल्या. त्याबाबत आजपर्यंत २२ तारखा झाल्या असून अजूनही सुनावणी सुरु आहे. अशा प्रकारे विरोधक कोपरगावच्या नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासुन वंचित ठेवू पाहत होते परंतु कोपरगावकरांचे आशीर्वाद पाठीशी असल्यामुळे त्यांचे मनसुबे यशस्वी होवू दिले नाही.विरोधकांच्या कार्यकाळातील काम पाहिले तर जलतरण तलाव कुठे आहे? संगमनेर बस स्थानकाच्या धर्तीवर शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधून बाजारपेठेला चालना मिळाले असती परंतु बस स्थानक चुकीचे बांधले, क्रीडा संकुलाचा शहराला उपयोग नाही असे अनेक चुकीचे काम केले आहे. याउलट कोपरगाव शहरामध्ये विकासात्मक अमुलाग्र बदल झाला असून अनेक शासकीय इमारती कोपरगावच्या वैभवात भर घालत आहे. यामध्ये उपजिल्हा रुग्णालय, पोलीस स्टेशन इमारत व कर्मचारी वसाहत,न्यायालय इमारत, पंचायत समिती, बस स्थानक व्यापारी संकुल, नगरपरिषद समोरील दोन व्यापारी संकुल, बाजार तळ व्यापारी संकुल, आय. टी.आय.कॉलेज अशा अनेक शासकीय इमारती आहेत. तसेच सर्व समाजाचे सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक सुशोभिकरण, जिजामाता उद्यान व इतर उद्याने, नदी संवर्धन, कोपरगाव अमरधाम, कब्रस्तान विकास तसेच सर्व प्रमुख रस्त्यांचा विकास झाला असून यासाठी साडेतीनशे कोटी निधी खर्च झाला असून भूमिगत गटार योजनेची प्रशासकीय मान्यता अंतिम टप्प्यामध्ये असून हे ३२३ कोटी मिळून जवळपास ७०० कोटी निधी शहरासाठी आणला आहे.परंतु आपल्याला यावर थांबायचे नाही. आपल्याला कोपरगाव शहर स्मार्ट सिटी करायचे असून राज्यात नंबर एक करायचे आहे. एम.आय. डी.सी.चा फायदा कोपरगावला मिळणार असल्यामुळे कोपरगावची बाजारपेठ फुलण्यास मदत होणार आहे. मात्र आपल्या कोपरगाव शहराच्या विकासात यापुढे कुणीही आडवे येता कामा नये. यासाठी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विकासाच्या आडवे येणाऱ्यांना गाडून टाका असे आवाहन करून आ.आशुतोष काळे यांनी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे.यावेळी व्यासपिठावर सर्व जाती धर्माचे साधू-संत,धर्मगुरू तसेच पद्माकांत कुदळे, महाराष्ट्र फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे, माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, डॉ. अजय गर्जे,कोपरगाव शहरातील प्रतिष्ठीत व्यापारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी माजी नगरसेवक,कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे पदाधिकारी आदींसह कोपरगावकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द•ख•ल

### सचिन देसरडांनी घेतले हरेगाव यात्रेत मतमाऊलीचे दर्शन



**नेवासा** : तालुक्याचे युवा नेते व भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सचिनभाऊ देसरडा यांनी लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या हरेगाव येथील मतमाऊलीच्या यात्रे निमित्त भेट देऊन दर्शन घेतले. नवसाला पावणारी मत माऊली हे क्षेत्र सर्व धर्मीय बांधवांचे श्रध्दास्थान बनले असल्याचे प्रतिपादन सचिनभाऊ देसरडा यांनी भेटी प्रसंगी बोलतांना केले. यावेळी मतमाऊली यात्रेच्या निमित्ताने दिलेल्या भेटी प्रसंगी त्यांच्या समवेत नेवासा तालुक्यातील भक्त परिवारातील सदस्य सुहास राठोड,संतोष भिंगारदिवे, सोनूभाऊ राठोड, यशवंत येळवंडे विजय आव्हाड, सागर पाटोळे, सनीभाऊ गाढवे हे नेवासा तालुक्यातील भक्त मंडळ उपस्थित होते.

### श्रीरामपुरात ईद ए मिलाद व पैगंबर जयंतीनिमित्त महाप्रसादाचे वाटप



**श्रीरामपूर** : येथे ईद ए मिलाद व पैगंबर जयंती निमित्ताने कर्मवीर चौकात (नियाज)प्रसादाचे वाटप येथील करण्यात आले.सामाजिक उपक्रमात अग्रेसर असलेल्या मेहंदी ग्रुपच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला यावेळी झालेल्या कार्यक्रमप्रसंगी भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय सचिव हनिफभाई पठाण,शिव स्वराज्य मंचचे अध्यक्ष सलमान पठाण,संदीप सेठ शेडगे,विशाल भाऊ मोजे,भारतीय लहुजी सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब बागुल,जिल्हा अध्यक्ष रजाकभाई शेख, अल्ताफभाई शेख,सिकंदरभाई तांबोळी,रमिज पोपटिया, राज शेडगे,फैजान पठाण,अफताब पठाण, मोसिन शेख, साहिल शेख,सद्दाम शेख,साहेबाज पठाण, जावेद शेख, अब्दुल महाराज शेख,इजाज शेख,रिजवान पिंजारी, आदि सह नागरिक उपस्थित होते. याप्रसंगी सर्वधर्मीय नागरिकांनी मुस्लिम बांधवांना ईद ए मिलाद व पैगंबर जयंती निमित्ताने गळाभेट घेत शुभेच्छा दिल्या.वाटप करण्यात आलेल्या निहाज प्रसादाचा सर्व धर्मीय समाज बांधवांनी लाभ घेतला.

### कोल्हार भगवतीपूर ट्रस्टला देणगीच्या आयकरात सवलत

**कोल्हार** : केवळ प्रवरा परिसरातीलच नव्हे तर परप्रांतातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेले साडेतीन शक्तीपिठांचे एकत्रित तीर्थक्षेत्र कोल्हार भगवतीपूर देवालय ट्रस्टला चालू आर्थिक वर्षापासून कलम ८० जी नुसार देणगी स्विकारण्यास आयकर आयुक्त पुणे कार्यालयाने मंजूरी दिली आहे. कोल्हार भगवतीपूर देवालय ट्रस्टच्या प्रकल्प आणि विकासासाठी जे भाविक आणि दानशूर भक्त स्वेच्छेने ट्रस्टला देणगी देतील त्यांना आयकर नियमानुसार चालू आर्थिक वर्ष २०२४ - २५ ते २०२६ - २७ या कालावधीसाठी आयकर विवरण पत्र दाखल करताना देणगी पावती च्या आधारे आयकरात सवलत मिळणार आहे. भाविक भक्तजनांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवालय ट्रस्टचे अध्यक्ष सयाजी तथा भाऊसाहेब रघुनाथ खर्डे, खजिनदार डॉ. भास्करराव खर्डे, माजी सरपंच ॲड सुरेंद्र खर्डे तसेच विश्वस्त मंडळाने केले आहे.

### आसिया शेख हिची पोलीस दलात निवड



**श्रीरामपूर** : प्रवरानगर येथील महात्मा गांधी कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी आसिया अकील शेख हिची नुकतीच रायगड पोलीस दलात निवड झाली आहे. तिच्या या निवडीप्रित्यर्थ प्रवरानगर येथील ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. अतिशय अभ्यासू आणि कष्टाळू आसियाने कौटुंबिक हलाखीच्या परिस्थितीत स्वतःच्या जिद्दवर मेहनत करून यश संपादन केले आहे. तिचे वडील प्रवरानगर येथे रिक्षा चालक आहेत. महात्मा गांधी संकुलाच्या वतीने उपप्राचार्य अलका आहेर, डॉ. शरद दुधाट, वर्गशिक्षक जवाहरलाल पांडे, ज्ञानदेव दवंगे यांच्या हस्ते तिचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

### गौतम मित्र मंडळाच्यावतीने श्री अथर्वशीर्ष पठण

**राहुरी** : शहरातील जैन स्थानकासमोरील गौतम मंडळ आणि सरस्वती नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त श्रीअथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले होते . यावेळी शहर व परिसरातील बहुसंख्य महिलांनी उस्फूर्तपणे आपला सहभाग नोंदवला . जैन स्थानकात रविवार ( दि.१५ ) रोजी झालेल्या या कार्यक्रमाला माजी नगराध्यक्षा डॉ. उषाताई तनपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. शहरातील जेष्ठ प्रसिद्ध डॉ. दीपा कुसळकर यांनी श्री गणेश व श्री अथर्वशीर्षाचे पौराणिक व शास्त्रोक्त अशी माहिती उपस्थित महिलांना सांगितली . यावेळी महिलांना अथर्वशीर्षची पुस्तिका देण्यात आली. डॉ. कुसळकर यांच्या समवेत महिलांनी अथर्वशीर्षाचे पठण केले . ग्लोबल स्कूलच्या संचालिका सारिका ढोकणे यांनी सूत्रसंचालन केले .

# सत्ता-संपत्ती-तारुण्याचा गर्व करू नका : अमोल महाराज गाडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव** : सत्ता, संपत्ती व तारुण्य हे नाशवंत आहे त्याचा गर्व करू नका, जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर सत्ता संपत्ती तारुण्य याकडे दुर्लक्ष करून पुढे जा छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवन चरित्र आत्मसात करा. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांनी ३६१ किल्ले जिंकून देखील एकाही किल्ल्याला आपले नाव दिले नाही त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद आहे अशा या महान राजाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत आपण राहत असून अशा या महान राजाचा आदर्श आपण डोळ्यासमोर ठेवावा असे आवाहन अमोल महाराज गाडे यांनी केले.

तालुक्यातील माळवाडगाव येथे गणेशोत्सवानिमीत्त जगदंबा युवा प्रतिष्ठान व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक मित्रमंडळाच्या वतीने अमोल महाराज गाडे यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी उपस्थित भाविकांना उपदेश करतांना अमोल महाराज गाडे बोलत होते.



**आपल्या धर्माचे पालन करावे**

धर्म टिकला तर देश टिकेल आणि देश टिकला तर आपण टिकू त्यामुळे आपण धर्मनिष्ठ व्हावे. आपल्या मुला मुलींना हिंदू धर्माचे संस्कार करावेत पाश्चिमात्य देशाची संस्कृती स्वीकारण्यापेक्षा आपली भारतीय संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ महान संस्कृती आहे आपल्या संस्कृतीचा आदर करा सन्मान करा आणि आपली संस्कृती जतन करा पाश्चिमात्य संस्कृतीकडे दुर्लक्ष करा जगाच्या पाठीवर सर्वश्रेष्ठ अशी एकमेव हिंदू संस्कृती आहे असे विचार यावेळी अमोल महाराज गाडे यांनी उपस्थितांसमोर मांडले. पत्रकार संदीप आसने, प्रशांत आसने, विठ्ठल आसने यांनी महाराजांचे संत पूजन केले तर जगदंबा युवा प्रतिष्ठान, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले होते. या समारंभास कैलास महाराज दुशींग, शिंदे महाराज, सागर महाराज पंडित, मुळाप्रवरेचे संचालक सिद्धार्थ मुरकुटे, अशोक सहकारी साखर कारखान्याच्या संचालिका मंजुश्रीताई मुरकुटे, तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष गणपतराव आसने, भाऊसाहेब चिडे, सुभाष आसने, बबनराव आसने, सदाशिव आसने, अनिल आसने, गोरख आसने, अशोक कामगार पतपेढीचे संचालक भाऊसाहेब आसने, भानुदास चिडे, दिलीपराव हुरुळे, लक्ष्मी माता मिल्कचे संचालक सुरेश चिडे, योगेश आसने, श्रीधर आसने, सुभाष मोरे, जगन्नाथ आसने, यशवंत हुरुळे, बाबुराव दळे, बाबासाहेब आसने, बापूसाहेब आसने, जयदीप आसने, राजेंद्र आसने, संजय आसने, विजय आसने, नानासाहेब आसने, लक्ष्मण थोरात, रामनाथ आसने, रवींद्र आसने, संतोष काळे, जालिंदर आसने, भारत आसने, गणेश आसने, भास्कर आसने, रावसाहेब काळे, बाळासाहेब हुरुळे, अंकुश आसने, जगदंबा युवा प्रतिष्ठानचे संस्थापक संदिप आसने, अध्यक्ष अतिश आसने, उपाध्यक्ष सतीश आसने, प्रशांत आसने, तन्मय आसने, श्रेयस आसने, सत्यम आसने, कार्तिक आसने, प्रदीप आसने, उध्दव आसने, विठ्ठल आसने, प्रमोद आसने, बबन बाळासाहेब आसने, दत्तात्रय मोरे, अमोल मोरे, पिंटू अनुसे, शोयब पठाण, तेजस आसने, अरबाज पठाण यांच्यासह भाविक मान्यवर पत्रकार भजनी मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.पत्रकार विठ्ठलराव आसने यांनी आभार मानले.

## सुनीलगिरी महाराजांचा मौन व्रत समाप्ती सोहळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : तालुक्यातील मुकींदपूर येथील श्रीराम साधना आश्रमामध्ये बुधवारी (दि.१८) सप्टेंबर रोजी आश्रमाचे प्रमुख महंत श्री सुनीलगिरीजी महाराजांचा अकरा दिवशीय मौन व्रत व अनुष्ठानाची समाप्ती होत असल्याने या निमित्ताने किर्तन सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रभु रामचंद्राच्या व प.पू. ब्रम्हलिन योगिराज प्रल्हादगिरीजी महाराज तसेच ब्रम्हलिन सद्गुरु स्वामी प्रकाशगिरीजी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने व देवगड गुरुदेव दत्त पिठाचे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या आशिर्वादाने सालाबाद प्रमाणे गणेशोत्सवानिमित्त गुरुवर्य महंत सुनिलगिरीजी महाराज यांचे शनिवारी दि.७ सप्टेंबर पासून मौन व्रत व अनुष्ठान सुरू झाले होते,या मौन व्रत व अनुष्ठानची समाप्ती बुधवार दि. १८ सप्टेंबर २०२४ रोजी होत आहेयानिमित्ताने नेवासा येथील श्री संत शिरोमणी सेना महाराज मंदिराचे मार्गदर्शक व युवा समाज प्रबोधनकार गायनाचार्य हभप सचिन महाराज पवार यांचे सकाळी ९ ते ११ यावेळेत हरिकिर्तन होणार आहे.महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांच्या मौन व्रत व अनुष्ठान समाप्तीच्या निमित्ताने होणाऱ्या संतपूजन व किर्तन सोहळा कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीराम सेवा मंडळ मुकिदंपूर-नेवासा फाटा व भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## दक्षिणमुखी मारुती मंदिरात खिचडीचे वाटप

**नेवासा** : नेवासा बुद्रुक येथे श्री रामदास स्वामींनी स्थापित केलेल्या जागृत दक्षिणमुखी मारुती मंदिरात एकादशीचे औचित्य साधून शाबुदाना खिचडी फराळाचे वाटप करण्यात आले.मनोकामना पूर्ण करणारी देवता अशी या तीर्थक्षेत्राची ओळख आहे. यावेळी दक्षिणमुखी मारुती मंदिर देवस्थानचे अध्यक्ष गंगा भाऊ शिंदे यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोष करत अभिषेक करण्यात आला.त्यानंतर भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. यावेळी देवस्थानचे उपाध्यक्ष किशोर गायकवाड, विश्वस्त धनंजय डहाळे, सचिव अँड.वसंतराव नवले, डॉ.माळवदे, अँड.शिंदे,विमा अधिकारी किशोर गारूळे, सयाजीराव रेडे, राजेंद्र थावरे उपस्थित होते.

# चिकणी व निमगाव भोजापूरसाठी स्वतंत्र तलाठी सजा कार्यालय




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी महसूल मंत्री पदाच्या काळामध्ये अनेक ऐतिहासिक निर्णय या खात्याला लोकाभिमुख बनवले. तालुक्यांमध्ये अद्यावत नऊ तलाठी कार्यालय उभारण्याबरोबरच महसूल कामकाजाच्या सोयीसाठी चिकणी व निमगाव भोजापूर करता स्वतंत्र सजा मंजूर करून या गावाला तलाठी कार्यालय दिले असल्याचे प्रतिपादन विधान परिषद सदस्य आमदार सत्यजित तांबे यांनी केले आहे.

चिकणी येथे नवीन तलाठी सजा कार्यालयाचा शुभारंभ आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते झाला यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी कॉम्रेड कारभारी उगले, दूध संघाचे संचालक विलासराव वर्पे, भारत वर्पे, किसान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आनंद वर्पे, सरपंच गायत्री माळी, उपसरपंच चंद्रभान मुटकुळे, राजेंद्र चांगदेव वर्पे, दत्त वर्पे,माधव वर्पे तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व चिकणी युवक काँग्रेसचे अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी बोलताना आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, आमदार बाळासाहेब थोरात यांनी साडेसहा वर्ष राज्याचे महसूल मंत्री पद सांभाळले या कार्यकाळात अनेक ऐतिहासिक निर्णय त्यांनी घेतले ऑनलाईन सातबारा, ८० लाख दाखले विद्यार्थ्यांना शाळेत देण्याचा विक्रम त्याच कार्यकाळात झाला. याचबरोबर अनेक वर्ष भिजत पडलेला खंडकरी शेतकऱ्यांचा प्रश्न त्यांनी सोडवला. महसूल कामकाजात सुलभता यावी याकरता या विभागाची संगणकीकरण केले. संगमनेर मध्ये अनेक वैभवशाली इमारती उभ्या केल्या. याचबरोबर संगमनेर तालुक्यात अद्यावत नऊ तलाठी कार्यालय उभारली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद वर्पे यांनी केले तर भारत वर्पे यांनी आभार मानले.

## गावभेटीतून स्थानिक प्रश्नांची उकल होते ना. विखे पाटील

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहाता** : गणेश उत्सवाच्या निमित्ताने महसूल तथा पालकमंत्री मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी गाव भेटीतून नागरीकांशी संवाद साधत 'विकासाचा श्रीगणेश' संकल्पनेला प्राधान्य दिले आहे. स्थानिक पातळीवरील रस्त्यांचा प्रश्न, शेतीशी निगडीत समस्या आशा अनेक प्रश्नाची उकल या गाव भेटीतून विखे पाटील यांनी करण्यास प्राधान्य देत गणेश उत्सवाला विकास प्रक्रीयेशी जोडून दिले आहे. यापुर्वीही मतदार संघात केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी मंत्री विखे पाटील यांच्या पुढाकाराने झाली आहे.

गणेश उत्सवाच्या या सामाजिक ऐक्याचे हे वातावरण विकास पर्वाशी जोडण्याचा प्रयत्न यशस्वी केला आहे. गणेश उत्सवाच्या निमित्ताने सर्व गावामध्ये गणेश मंडळानी भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यंदा गणेश उत्सवाचा जोषही चांगला असल्याने प्रत्येक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विविध उपक्रमाचे आयोजन करून या उत्सवाचा आनंद वाढवला आहे.मंत्री विखे पाटील यांनी राहाता तालुक्यातील विविध गावात गणेश मंडळाना भेटी देवून ग्रामस्थ, युवक आणि महीलांशी संवाद साधून त्याच्याशी विकास काम तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला आहे.तालुक्यात अद्यापही अपेक्षे प्रमाणे पाऊस झालेला नाही. पण धरणं भरल्याचे समाधान सर्वानाच होते. तालुक्यातील पाण्याची गरज लक्षात घेवून विखे पाटील यांनी ओव्हरफ्लोचे पाणी कालव्यांना सोडण्याचे आदेश दिले, या निर्णयामुळे लाभक्षेत्राला मोठा दिलासा मिळाला आहे.

# गणेश उत्सवात समतेची भावना : आ. बाळासाहेब थोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : अहमदनगर जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या संगमनेर शहरात पौराणिक, ऐतिहासिक व विविध आकर्षक देखाव्यांसह गणेश मंडळांनी मोठे आरस केले आहे. हे आरस पाहण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आ. बाळासाहेब थोरात यांनी शहर व ग्रामीण भागात विविध गणेश मंडळाच्या आरतींना भेट दिली याचबरोबर या गणेशोत्सवाच्या आनंदपर्वातून समतेची भावना वाढीस लागत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले .

आ. बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते विविध ठिकाणी गणेश मंडळांची आरती झाली. यावेळी समवेत कांचनताई थोरात, दुर्गाताई तांबे, डॉ.जयश्रीताई थोरात, रचनाताई मालपाणी, दिलीपराव पुंड,विश्वासराव मुर्तडक,सोमेश्वर दिवटे,



संज्योत वैद्य, निखिल पापडेजा, गणेश महाराज, आदींसह संगमनेर शहरातील अनेक महिला पदाधिकारी युवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. थोरात म्हणाले की, यावर्षी राज्यात सर्वत्र चांगला पाऊस झाला आहे.धरणे भरली आहेत. परंतु अजूनही ज्या भागांमध्ये पाऊस नाही त्या भागामध्ये पाऊस व्हावा. गणेशोत्सवाला मोठी परंपरा असून हा उत्सव आता देशाचा झाला आहे. याचबरोबर बाहेरील देशांमध्ये मोठ्या आनंदाने हा उत्सव आता साजरा होतो आहे. सर्वजण एकत्र येऊन दहा दिवस आनंद साजरा करतात. सर्वांनी एकत्र येऊन समतेची भावना वाढीस लागावी. प्रत्येकाने एकमेकांच्या सुःख दुःखात सहभागी व्हावे हा संदेश देणारा हा सण आहे. मात्र काही लोक यामध्येही राजकारण करून धार्मिकतेचे राजकारण करत आहेत. सध्या देशात व राज्यामध्ये विकासाऐवजी होत असलेले धर्माचे राजकारण हे अत्यंत दुर्दैवी आहे. राज्यामध्ये सरकार अस्थिर असून महिला व बालिका सुरक्षित नाहीत. महिला व बालिका सुरक्षित व्हाव्यात, शेतकरी समाधानी व्हावा, तरुणांच्या हाताला काम मिळावे. राज्यात उद्योग व्यवसाय वाढून महाराष्ट्र हे पुन्हा वैभवशाली व समृद्ध राष्ट्र व्हावे ही गणेश चरणी प्रार्थना करताना संगमनेर मध्ये सर्वांनी मोठ्या आनंदानं गणेशोत्सव साजरा केला आहे. तर डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, गणेश विसर्जनासाठी एकविरा फाउंडेशनच्या वतीने ३०० स्वयंसेवक निर्माल्य संकलन व विसर्जनासाठी सर्व नागरिकांना मदत करणार आहेत तरुणांनी नदीकाठी विसर्जन करताना अति उत्साह व पाण्यात जाऊन सेल्फी साठी जास्त धाडस करू नये असे आवाहन केले.

> **आ.थोरात यांच्या समवेत सेल्फीसाठी तरुणाईची गर्दी**
>
> आमदार बाळासाहेब थोरात हे राज्यातील सूसंस्कृत नेते असून राज्यभर तरुणांमध्ये त्यांची मोठी क्रेझ आहे.संगमनेर मधील तरुणांसाठी ते आयकॉन असून प्रत्येक गणेश मंडळाच्या ठिकाणी आ. बाळासाहेब थोरात यांच्या समवेत सेल्फी घेण्यासाठी तरुणांची व कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली. यावेळी अनेक ठिकाणी तरुणांनी भावी मुख्यमंत्री थोरात साहेब अशी घोषणाबाजी केली.

(पान १ वरून) (पान १ वरून)

## मनोज जरांगे पाटलांचे आजपासून पुन्हा उपोषण

निवडणुकीत धडा शिकवणार असा इशारा देत जरांगे पुन्हा उपोषणाला बसणार आहे.

दरम्यान, जरांगे यांची मनधरणी करण्यासाठी शिंदे सरकारकडून सध्या प्रयत्न सुरु आहे. काही दिवसांपूर्वी मंत्री अब्दुल सत्तार यांनी अंतरवाली सराटी येथे जाऊन जरांगे यांची भेट घेतली होती. त्यानंतर छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदीपान भुमरे देखील जरांगेंच्या भेटीला गेले होते. पण या भेटीत काय चर्चा झाली? याबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

## ट्रक चालकाचा पश्चिम बंगालमध्ये मारहाणीत मृत्यू; मयत टाकळीभानचा

अपघात घडल्यानंतर वाहनचालकानेच तात्काळ पोलिसांना त्याची माहिती देणं बंधनकारक आहे. पोलिसांना अपघाताची माहिती न देता पळून गेल्यास कमीत कमी १० वर्षाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, नियमाचे पालन करत असताना टाकळीभान येथील शाम याला जीव गमवावा लागला. त्याच्या पश्चात आई, पत्नी व दोन मुले आहेत.

## मोटारसायकली चोरणारा अट्टल गुन्हेगार पकडला ; २७ मोटारसायकल हस्तगत

केलेल्या एकूण २७ मोटार सायकली जप्त केल्या असून एकूण ११, १७,००० किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीने मोटार सायकली जळगाव जिल्हयातील शिवरे तरवाडे आडगाव व धरणगाव येथील शेतकरी व कामगार लोकांना विक्री केल्याचे समोर आले.

त्याबाबत नाशिक शहरातील एकूण १४ गुन्हे उघडकीस आले आहेत सदरची कारवाई पोलीस आयुक्त सदिप कर्णिक गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त प्रशांत बच्छाव गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त सदिप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली संतोष नरुटे यांच्या पथकाने धडकेबाज कारवाई केली. तसेच उर्वरित ताब्यात असलेल्या १७ मोटार सायकली अभिलेख पडताळणी सुरु असल्याची माहिती पोलीस प्रशासनाने दिली.

# देडगाव सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव :** नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या सभेच्या अध्यक्षस्थानी गाथामूर्ती हभप सुखदेव महाराज मुंगसे होते. यावेळी सचिव रामा तांबे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करून सभासदापुढे सोसायटीचा ताळेबंद मांडला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रामदास तांबे म्हणाले, या सोसायटीचे खेळते भाग-भांडवल २.५ कोटीचे असून संस्थेची वार्षिक उलाढाल २६ कोटीची आहे. ही संस्था आपली सर्वांची असून सर्वांनी वेळेवर कर्ज भरावे. यावेळी रघुनाथ कुटे, माजी चेअरमन बाबासाहेब मुंगसे, सरपंच चंद्रकांत मुंगसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

वार्षिक सभेसाठी सोसायटीचे उपाध्यक्ष रामनाथ गोयकर, संचालक योसेफ हिवाळे, माजी सरपंच रामेश्वर गोयकर, संदीप कुटे, जनार्धन मुंगसे, सागर बनसोडे, उपसरपंच महादेव पुंड, राजाराम मुंगसे, माजी चेअरमन महेश कदम, काशिनाथ टकले, मुरलीधर मुंगसे, माजी सरपंच दत्ता पाटील मुंगसे, संजय मुंगसे , हवालदार पठाण, पोपट देशमुख, शिवाजी कोकरे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब मुंगसे, अंबादास तांबे, रंगनाथ कोकरे, संजय गोयकर आदी संस्थेचे खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थेचे कर्मचारी गोरख देवकाते, गणेश सुसे, हरिभाऊ गोफने, राजेंद्र अंबाडे यांनी या सभेचे उत्कृष्ट आयोजन केले. संस्थेच्या वतीने सभासदांना मिठाईचे वाटप



करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार युनूस पठाण यांनी मानले.

# संजीवनीच्या ऋतुजा शिंदे व प्रभज्योत सिंगची जिल्हा बुध्दिबळ स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कोपरगांव :** संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित संजीवनी ज्युनिअर कॉलेजच्या ऋतुजा समीर शिंदे हिने आपल्या बुध्दिचातुर्याच्या जोरावर वेगवेगळ्या चालींची खेळी करून तालुकास्तरीय बुध्दिबळ स्पर्धेत पाच पैकी पाच फेऱ्या जिंकत आघाडी घेतली तर प्रभज्योत सिंगने चार फेऱ्या जिंकल्या. आता त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहमदनगर व कोपरगांव तालुका क्रीडा समितीच्या वतीने ही स्पर्धा संजीवनी मीडियम स्कूल येथे झाली. ऋतुजा व प्रभज्योत निवडीमुळे संजीवनीचे विद्यार्थी मैदानी खेळाबरोबरच बुध्दीचार्याच्या खेळातही अग्रेसर असल्याचे अधोरेखित झाले,अशी माहिती संजीवनी ज्यु. कॉलेजच्या वतीने देण्यात आली आहे.

संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी ऋतुजा व प्रभज्योत सह प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंडगे व बुध्दिबळ मार्गदर्शक प्रा. सागर गांधी यांचे अभिनंदन केले आहे, तसेच ऋतुजा व प्रभज्योतला जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहे.



**संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी ऋतुजा शिंदे व प्रभज्योत सिंगची जिल्हास्तरीय बुध्दिबळ स्पर्धेसाठी निवड झाल्याबध्दल अभिनंदन केले. (छाया : लक्ष्मण जावळे)**



## डॉ. राजेंद्र सानप यांना लोकरत्न पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बीड :** डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन बीड येथे देशभक्त स्वांतत्र्य सैनानी,भारतीय संविधान समिती चे सदस्य माजी मंत्री पद्मश्री डॉ रत्नाप्पा कुंभार यांच्या ११५व्या जयंती निमित्त अ. भा. कुंभार समाज विकास संस्थेच्या वतीने

सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील उल्लेखनीय कार्याबद्दल. लोकरत्न पुरस्काराने मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष व गुरूवर्य भगवान महाराज सार्व वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे ग्रंथपाल डॉ राजेंद्र सानप यांना सन्मानित करण्यात आले.

यावेळी सावता परिषदचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसओ .बी .सी. सेल प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे व बारा बलुतेदार संघाचे अध्यक्ष कल्याणराव दळे,अ. भा. कुंभार समाज संस्थेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वर भागवत,राष्ट्र वादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष महेशराव शिंदे, बीड जिल्हाध्यक्ष रामदास कुंभार,मनोहर जगदाळे,भागवत वैद्य,सतिषदादा दरेकर,कैलास कुंभार,आदी मान्यवर उपस्थित होते.


## छोटी जाहीरात

I, Smt Gorde Kesar, legally mother of No 15421345P Late Nk (Nur asst) Gorde Ganesh Dagadu, Unit 331 Field Hospital c/o 56 APO, Presently residing at VillaKelwad, Posta Kelwad TehsilaRahata, Dist Aahemadnagar have changed my Name from Gorde Kesar to Kesharbai Dagadu Gorde

I, Mrs Kavita Gorde, legally wife of No 15421345P Late Nk (Nur asst) Gorde Ganesh Dagadu, Unit 331 Field Hospital c/o 56 APO, Presently residing at VillaKelwad, Posta Kelwad Tehsila Rahata, Dist Aahemadnagar have changed my Name from Mrs Kavita Gorde to Kavita Ganesh Gorde and DOB from 29 Sep 1988 to


# जिजामाता शारदोत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी जगदाळे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** येथील प्रसिद्ध व्यावसायिक भरत जगदाळे यांची जिजामाता तरुण मंडळ शारदोत्साव अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जिजामाता तरुण मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे नगर जिल्हा उपाध्यक्ष सचिन बडदे होते.

व्यासपीठावर प्रमुख अतिथी सचिन गुजर ,दत्तात्रय धालपे, शिवसेनेचे अशोक मामा थोरे ,भगवान उपाध्ये, माऊली मुरकुटे कल्याण कुंकुलोळ, सुनील गुप्ता, पत्रकार प्रकाश कुलथे, आशिष धनवटे ,लखन भगत, अँड प्रमोद वल्टे, संजय निकम, सिद्धांत छल्लारे, सुधीर वायखिंडे, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संजय छल्लारे यांनी आपल्या प्रास्ताविकात मंडळाच्या गेल्या ३६ वर्षा च्या कार्यकाळातील उपक्रमांची माहिती दिली. या वर्षासाठीची कार्यकारणी जाहीर केली. उपाध्यक्षपदी संजय संचेती ,राजेंद्र आदिक, कार्याध्यक्षपदी भगवान उपाध्ये, अशोक मामा थोरे, सेक्रेटरी पदी तेजस बोरावके व संतोष चापानेरकर ,सह सेक्रेटरी महेंद्र टाटिया, अकिल पठाण, विशाल पापडीवाल ,खजिनदारपदी देवेन पीडीआर ,लोकेश नागर ,संघटक लखन भगत, संजय साळवे ,प्रसिद्ध प्रमुख स्वामीराज कुलथे ,रोहित नाईक, योगेश धासाळ, दीपक कदम, स्वागत समिती पदी संजय लाड ,शरद गवारे ,विक्रांत गंगवाल ,किशोर कु-हे ,कैलास जगदाळे ,राजेश यमे ,शेखर पालकर ,अनंद यमे ,सजावट कमिटी ज्ञानेश्वर सारंगधर ,गोपाल आहेरराव ,प्रमोद गायकवाड, विशाल राहिले, शरद यमे, कायदेशीर सल्लागार अँड प्रमोद वल्टे ,सागर पटेल ,विलास थोरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# श्री गणेश नेत्रालयाचे उत्साहात उद्घाटन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. वैभवी गिरमे-आगाशे यांच्या स्व. एकनाथदादा गिरमे चौकातील श्री गणेश नेत्रालय या नव्या क्लिनीकचा शुभारंभ रविवारी झाला.

श्री गणेश नेत्रालय क्लिनीकचे उद्घाटन डॉ. वैभवी गिरमे व त्यांचे पती डॉ. अजिंक्य गिरमे यांनी आपले पिताश्री सुरेंद्रनाना गिरमे व मातोश्री साधना गिरमे तसेच डॉ. वैभवींचे पिताश्री संजीव आगाशे व मातोश्री माधुरी आगाशे यांचे वंदन करून त्यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन केले.

श्री गणेश नेत्रालय हे भव्य-दिव्य इमारतीमध्ये साकारले असून डॉ. वैभवी गिरमे-आगाशे या नेत्ररुग्णाची तपासणी करणार आहेत. फेको शस्त्रकि'या (बीना टाका व भुल न देता), अद्यावत भिंगावरोपन, डोळ्यावरच्या पडद्याची शस्त्रकि'या, आधुनिकपणे तिरळेपणाची शस्त्रकि'या, लहान मुलांच्या नेत्राची तपासणी, डोळ्यांचे कोरडेपणाचे उपचार, वातामुळे निर्माण होणारे विकार, आळशी डोळ्यांचे उपचार, मागच्या पडद्याचे विकारांचे निदान उपचार, कॉन्ट्रॅक्ट लेन्स अशा विविध सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. क्लिनीकचे उद्घाटनप्रसंगी शुभेच्छा देण्यासाठी माजी खा. सदाशिव लोखंडे, आ. लहू कानडे, माजी आ. भाऊसाहेब कांबळे, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, उपनगराध्यक्ष करण ससाणे, हेमंत ओगले, डॉ. योगेश बंड, डॉ. कुमार चोथाणी, डॉ. राहिंज, डॉ. संजय अनारसे, डॉ. प्रदीप टिळेकर, डॉ. एन. जी. चौधरी, कामगार नेते अविनाश आपटे, कोपरगावचे बाळासाहेब पांढरे, आजी-माजी नगरसेवक, शहरातील वैद्यकीय व्यावसायिक, औषध विक्रेते, महिला मंडळाच्या सदस्या, व्यापारी, शेतकरी, माळी समाज व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. स्वागत सुरेंद्रनाना गिरमे, संजय आगाशे, डॉ. अजिंक्य गिरमे, डॉ. वैभवी गिरमे आदींनी केले.



**श्रीरामपूर शहरातील गिरमे चौकात डॉ. वैभवी गिरमे यांच्या श्री गणेश नेत्रालयाचे उद्घाटन करतांना सुरेंद्रनाना गिरमे, साधना गिरमे, संजय आगाशे, माधुरी आगाशे, डॉ. अजिंक्य गिरमे आदी.**

# नवीन पुणे नाशिक औद्योगिक महामार्गाची आवश्यकता नाही : आ. थोरात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्ग असताना नवीन पुणे नाशिक औद्योगिक महामार्गाची आवश्यकता नाही हे कशासाठी चालले आहे याचं कोडं मलाही उलगडलेले नाही असे मत काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी महसूल मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांनी संगमनेर येथे व्यक्त केले.

पुणे नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्ग कायमस्वरूपी रद्द करावा या मागणीसाठी बाधित शेतकरी संघर्ष समितीचे प्रमुख बाळासाहेब औटी यांच्या नेतृत्वाखाली बाळासाहेब थोरात यांची संघर्ष समिती पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन निवेदन दिले यावेळी समितीचे सहप्रमुख माऊली शेळके वल्लभ शेळके, समन्वयक मोहन नायकवडी, ज्ञानेश्वर शेळके, अविनाश हाडवळे, गोविंद हाडवळे, तसेच संगमनेर तालुक्यातील शेडगाव, मालुंजे, डिग्रज, काही शेतकरी उपस्थित होते. शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने आज शेडगाव येथील फड वस्ती, ओझर येथील बाधित शेतकऱ्यांच्या भेटी देऊन संवाद यात्रेच्या निमित्ताने त्यामध्ये भूसंपादनाचा कायदा, बाधित शेतकरी त्याचे होणारे विस्थापन,१९५५ व १९५६ चा भूसंपादनाचे कालबाह्य कायदे रद्द करा आणि २०१३ चा भूसंपादनाचा कायदा जसा आहे तसा अमलात आणा आधी मागण्यांबाबत या संवाद यात्रेच्या निमित्ताने बाधित शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली.

या संवाद यात्रेच्या निमित्ताने शेडगाव येथील अशोक फड व अनिल नागरे म्हणाले की पुणे नाशिक औद्योगिक महामार्ग रद्द झाला पाहिजे या मागणीसाठी या पट्ट्यातील शेतकऱ्यांचा प्रखर विरोध आहे याचे शासनाने दखल घ्यावी.





# चितळी महाविद्यालयात हिंदी दिवस उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**चितळी :** रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय चितळी येथे (ता.१४) सप्टेंबर 'हिंदी दिवस' उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांकडून 'हिंदी विषय शिक्षकांचा' पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगत व्यक्त करून हिंदी दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी कविता वाचन, गीत गायन नाटिका सादर करण्यात आली.

इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी' आपले संविधान' या विषयावर आधारित सुंदर पथनाट्य सादर केले. यावेळी सोहन लाल द्विवेदी यांची 'कोशिश करने वालो की कभी हार नही होती'.

ही कविता शिक्षक किशोर लंगोटे यांनी सादर केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक सुधाकर पिलगर होते व मुख्याध्यापक अर्जुनराव धोत्रे यांनी हिंदी दिनाच्या कार्यक्रमाचे कौतुक केले हिंदी विषयाचे शिक्षक मिर्झा एस ए.बर्डे पी.ए यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

# रुग्णांना फळाचे वाटप कौतुकास्पद : कातोरे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** गणपती उत्सवा निमित्ताने विविध खर्चाला फाटा देउन समाजातील लोकांना काही तरी मदत करता येईल या भावनेने रुग्ण सेवेचा अनोखा उपक्रम निमगाव कोराळे गावात असलेल्या क्रांती चौक येथील साई मल्हार शाखा नंबर दोनच्या वतीने महसूल मंत्री राधाकृष्ण विखे, माजी खा. डॉ सुजय विखे, निमगाव निमगाव ग्रामपंचायतचे सरपंच कैलास कातोरे सामाजिक कार्यकर्ते मनोज कुल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली साईनाथ रुग्णालय दोनशे रूम शिर्डी या ठिकाणी घेण्यात आला. त्या प्रसंगी बोलताना कैलास कातोरे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. गणेश उत्सवा निमित्त मोठ्या कार्यक्रमाला फाटा देत दवाखान्यात दाखल असलेल्या चारशे रुग्णांना सफरचंद केळी आदी फळे वाटप करुन अनोखा उपक्रम राबविण्यात आला यावेळी मंगेश कातोरे मधुकर वालेकर सोपान भंडागे कृष्णा पाटील सागर निरपगारे निलेश अहिरे रवी पाटील कमलेश कदम ज्ञानेश्वर देसले ज्ञानेश्वर सोनवणे आदींसह तरुण कार्यक्रमात सहभागी झाले होते.

## १७ सप्टेंबर २०२४, आजचे राशीभविष्य (अंकशास्त्र)

| क शुभ अंक | | | |
|---|---|---|---|
| ५ | ४९ | ९ | ० |
| एकच (५०) (४५) | | | |
| ५८ | ४४ | ९४ | ०५ |
| ५७ | ४३ | ९९ | ०३ |
| ५० | ४५ | ९६ | ०७ |
| ५०० | ४५५ | ११७ | २९९ |
| १७७ | १४९ | २३४ | ४८८ |
| - | - | - | - |
| सोमवार ते शनिवार ४८९(३१)१३७ | | | |

| मि शुभ अंक | | | |
|---|---|---|---|
| ८ | ३ | ६ | १ |
| एकच (८३) (५२) | | | |
| ८३ | ३९ | ६५ | ११ |
| ८८ | ३६ | ६१ | १० |
| ८९ | ३८ | ६६ | १६ |
| ५५८ | ३५५ | ५५६ | ५६० |
| ९९० | ३०० | २७७ | १९९ |
| - | - | - | - |
| सोमवार ते शनिवार १५९(५५)५०० | | | |

| मे शुभ अंक | | | |
|---|---|---|---|
| ७ | १ | ६ | ८ |
| एकच (७६) (४९) | | | |
| ७८ | ७५ | ६५ | ४९ |
| ७२ | ७६ | ६८ | ४२ |
| ७७ | ७७ | ६३ | ४६ |
| ५५७ | ५५७ | ५५६ | ४५५ |
| ३७७ | ३७७ | २७७ | ४४६ |
| - | - | - | - |
| सोमवार ते शुक्रवार ४४६(४९)५५९ | | | |

आर मो. ९९२३०८७१५५

दखल



## एकदंत गणेश मंडळाच्या वतीने विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण

**नगर** : श्री एकदंत गणेश मंडळाच्या वतीने एकदंत कॉलनी, दातरंगे मळा येथे गणेश उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांसाठी आणि महिलांसाठी विविध स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते.त्यासर्व स्पर्धे चे बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संदिप दातरंगे उपस्थित होते. तसेच परिसरातील नागरीक उपस्थित होते.यावेळी मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी लिंबू चमचा, बादलीत बॉल टाकणे, एक मिनिट शो, संगीत खुर्ची स्पर्धा व महिलांसाठी पाककला, संगीत खुर्ची,विडी वळवणे स्पर्धा घेण्यात आले. या स्पर्धे तील विजेत्या स्पर्धकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आकर्षक असे बक्षीस देण्यात आले. सूत्रसंचालन रोशन सुंकी, विनीत इराबत्तीन यांनी केले तर आभार प्रदर्शन ओंकार बुरगुल व यश मंचे, अमर सादुल यांनी केले. गणेश उत्सव यशस्वीतेसाठी श्री एकदंत गणेश मंडळ व श्री एकदंत महिला मंडळाच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी परिसरातील महिला, विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## राधाकृष्ण मंडळाच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन



**नगर** : येथील रंगार गल्लीतील राधाकृष्ण मित्र मंडळाच्या मंडळ च्या वतीने आज गणेश उत्सवात आरती व महाप्रसाद वाटप नगरसेविका शितल जगताप यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी सुरेखा दंडी, भांगे ,गोयल परिवार, घुबे आदी महिला कार्यकर्त्यांसह रवी दंडी,स्वयम बुरा,ओम भंडारी, प्रसाद चौधरी, सार्थक कोंडा, श्रीपत गोरख ,रवी कापसे आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जगताप म्हणाल्या अन्नदानासारखं दुसरं दान नाही आज या ठिकाणी माझ्या हस्ते या मंडळांनी आर्थिक केली व महाप्रसाद वाटप केला त्याचा मी कौतुक करते तसेच मंडळ विविध कार्यक्रम वर्षभर राबवत असते मंडळाचे रवी दंडी व सुरेखा दंडी यांच्या सामाजिक कार्याला तोड नाही त्यांचेही मी कौतुक करते. यावेळी देखावे पाहणाऱ्या आलेल्या हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला

## जय माता दी मंडळाच्यावतीने महाप्रसाद वाटप कार्यक्रम

**नगर** : सावेडी येथील श्रमिकनगर मधील जय माता दी मित्र मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी गणेश उत्सवाचे आयोजन करण्यात आले. गणेश उत्सवानिमित्त प्रतिष्ठान ५ फुटी गणेश मुर्तीची विधीवध पुजा करुन प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. गणेश उत्सावानिमित्ताने प्रतिष्ठानच्या वतीने सत्यनारायण महापुजेनिमित्त भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाआरती व सत्यनारायण पुजेनंतर भाविकांना महाप्रसाद देण्यात आले. असंख्य भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावर्षी मंडळाच्या वतीने गणेश उत्सवानिमित्त संगीत खुर्ची, लिंबु चमचा, एक मिनिट शो, रांगोळी स्पर्धा स्पर्धा आदींचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्ते व महिलांनी परिश्रम घेतले.

## कीर्ती देहेरेकर पैठणीच्या मानकरी

**नगर** : तोफखाना येथील माळ्याची चावडी येथील मंडळाने होम मिनिस्टर, खेळ पैठणीचा हा कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये कीर्ती देहेरेकर या प्रथम येऊन पैठणीच्या मानकरी ठरल्या त्याना फ्रिज पण देण्यात आला, द्वितीय भावना परदेशी, आटा चक्की, तृतीय रंजना धोत्रे सोन्याची नथ ,चतुर्थ दीपमाला म्यामा एलईडी टीव्ही, पाचवा क्रमांक पल्लवी मोडक वाशिंग मशीन,मिक्सर मोहिनी रचा व गॅस शेगडी, इंडक्शन हेही उत्तेजनार्थ भेट देण्यात आले.

# १८ सप्टेंबरच्या कॅबिनेटला टप्पावाढ निर्णय घेऊन तात्काळ शासन आदेश काढा

## शिक्षक समन्वय संघाच्या वतीने अजितदादा पवार यांना निवेदन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : राज्यातील अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना आपल्याच सरकारने ११६० कोटी रूपयांची तरतूद करत १६ वर्ष विनावेतन कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन सुरू केले आहे याबद्दल आपले खरे तर आभार व्यक्त करावे तेवढे थोडेच आहे. परंतु या अल्पशा वेतनामुळे आजच्या महागाईच्या वणव्यात जीवन जगण्यासाठी कसरत करावी लागते आहे.

राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व वर्गतुकड्यांतील ६५ हजार विना तथा अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना शासननिर्णय १५ नोव्हेंबर २०१५ व ०४ जून २०१४ मधील वेतन अनुदान वितरणाचे सुत्र लागू करत या शाळांना १ जानेवारी २४ पासून विनाअट टप्पा वाढ लागू करणे, शासनाच्या चुकीमुळे १२,१५ व २४ फेब्रुवारी २१ च्या शासननिर्णयान्वये शासन स्तरावर त्रुटी पात्र ठरलेल्या शाळांना निधीसह समान टप्पावाढ लागू करणे यासह इतर मागण्या साठी शिक्षक समन्वय संघावतीने मुंबईतील आझाद मैदानावर १६ ऑगस्ट २४ पासून हुंकार बेमुदत आंदोलन पुकारण्यात आले आहे.

राज्यातील 'कायम' शब्द काढलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यावर सुमारे ६५ हजार शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी 'पंधरा ते वीस' वर्षा पासून काही 'विनावेतन' तर काही तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत. महाराष्ट्राच्या महान शैक्षणिक परंपरेचा हा अपमान आहे. शिक्षक दिनी शिक्षकांना देशाचे शिल्पकार, आधारस्तंभ म्हणायचे आणि त्यांच्या सेवेला वीस- वीस वर्षे झाली तरी विनावेतन राबवून घ्यायचे. एव्हढ्या प्रचंड कालावधीत विनावेतन आणि तुटपुंज्या वेतनावर काम करत असताना हे शिक्षक आपला उदरनिर्वाह कसा करत असतील याची जराही संवेदना राज्यकर्त्यांना नाही, या वेदना शासनापर्यंत पोहचवण्यासाठी शिक्षक समन्वय संघाच्यावतीने येत्या १६ ऑगस्ट पासून शासनाच्या दारी बेमुदत धरणे करत आहोत. त्यामुळे शिक्षकांच्या मांगण्यांचा अंत न पाहता खालील मागण्या बाबत पालक सरकार म्हणुन आपण यथोचीत न्याय कराल. १) अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना १ जानेवारी २०२४ पासुन शासननिर्णय १५ नोव्हेंबर २०११व ४ जून २०१४ मधील तरतुदीनुसार प्रतिवर्षी विना अट टप्पा वाढ लागू करणे. २) शासनाच्या चुकीमुळे शासननिर्णय १२,१५ व २४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ३० दिवसाच्या आत शासनस्तरावर त्रुटी पूर्तता केलेल्या प्राथ, माध्य, उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना समान टप्पावाढ देणे.३) राज्यातील पुणे स्तरावरावरील अघोषित शाळांना अनुदानास पात्र करून वेतन अनुदान मंजूर करणे. या मागणीसाठी शिक्षण समन्वय संघाचे समन्वयक शिक्षक भारती विनाअनुदान विरोधी संघर्ष समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांना महिला आघाडी राज्याध्यक्षा रुपालीताई कुरुमकर यांनी निवेदन दिले.



## २८ विद्यार्थ्यांची पोलीस दलासह अन्य शासकीय सेवेत निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : विद्यार्थ्याने आपल्या ध्येय निश्चितीसाठी कायम मेहनत,जिद्द व चिकाटी स्वतःमध्ये ठेवणे गरजेचे असून जो विद्यार्थी सातत्याने कष्ट घेतो तो निश्चित कोणत्या तरी परीक्षेत यश मिळवतो.स्वतःला कायम कामामध्ये गुंतवून ठेवत जा त्या अनुभवातून आपले आचार विचार समृद्ध होतात असे मत आमदार मोनिका राजळे यांनी व्यक्त केले.

पाथर्डी येथे शिवछत्रपती करिअर अॅकॅडमीचे सुमारे अठ्ठावीस विद्यार्थी पोलीस व इतर शासकीय सेवेत त्यांची निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने गुण गौरव आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी त्या बोलत होत्या.याप्रसंगी माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, डॉ.मृत्युंजय गर्जे,नंदकुमार शेळके,पोलीस उपनिरीक्षक सचिन लिंमकर,विष्णूपंत अकोलकर,संदीप पठाडे,मंगल कोकाटे ,ज्योती शर्मा,नितीन एडके,सचिन वायकर,प्रा. विजय देशमुख,शिवछत्रपती अॅकॅडमीचे संचालक किशोर मरकड,पोलीस हेडकॉन्स्टेबल अमोल आव्हाड,सचिन कोलते हे उपस्थित होते. राजळे म्हणाल्या, वाचन, लेखन, सराव व नियोजन यामुळे आपल्या ज्ञानामध्ये भर पडते.तालुक्याची दुष्काळी अशी ओळख जरी असली तरी पण या ठिकाणी शिक्षणाचा दुष्काळ नसून परिस्थितीला मात करून विविध स्पर्धा परीक्षांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठे यश संपादन करत आहे.जीवनात प्रत्येक संकटाला सामोरे जाऊन यश मिळवण्यासाठी प्रचंड मेहनत करा असे शेवटी आवाहन राजळे यांनी केले.

प्रास्ताविक सचिन वायकर, सूत्रसंचालन तुकाराम मरकड यांनी करून आभार पांडूरंग मरकड यांनी मानले.

## महाविकास सरकारमध्ये पवार मंत्री होणार : लंके



कर्जत : महाविकास आघाडीच्या सरकार मध्ये रोहित पवार यांना लाल दिवा मिळणार असे प्रतिपादन खा निलेश लंके यांनी कोळवडी ता कर्जत येथील पोपटराव नलवडे यांच्या प्रयत्नातून व आ रोहित पवार यांच्या सहकार्याने विविध विकास योजना शुभारंभ प्रसंगी केले.

खा. लंके पुढे म्हणाले की, महाराष्ट्र राज्याच्या तिजोरी च्या चाव्या रोहित पवार यांच्या हातात येणार आहेत त्यामुळे कर्जत जामखेड मतदारसंघ ला विकास कामा साठी निधीची कमतरता पडणार नाही. पवार इज पॉवर आणि पॉवर इज पवार. कुणाचाही नाद करा मात्र पवारांचा नाद करू नका.आसा सल्ला विरोधकांना लगावत लंके म्हणाले की, पवार साहेबांनी माझ्या सारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला खासदारपदी बसविले. कुटुंब प्रमुख म्हणून रोहित पवार यांनी लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्वांची जबाबदारी पार पाडत आहे. जलसंधारण, दळणवळण, आरोग्य, कृषी विविध क्षेत्रात भरवि विकास कामे केली आहेत. मतदारसंघ राज्याच्या उंची वर नेऊन ठेवला आहे.

यावेळी , उद्योजक शिवाजीराव थोरात, संतोष म्हेत्रे, सुनील शेलार, ऋषिकेश धांडे, राहुल नवले यांची भाषणे झाली. आभार सागर नलवडे यानी मानले. तर या कार्यक्रमासाठी अतुल पाटील, ज्ञानदेव लष्कर, शामल नलवडे, ग्रामसेवक शितल तापकीर मधुकर दंडे, भाऊसाहेब तोरडमल, भास्कर भैलुमे, बाळासाहेब सांळुके आदी मान्यवर उपस्थित होते. प्रस्तावित भाऊसाहेब दवणे यांनी केले तर सागर नलवडे यांनी आभार मानले.

**पोपटराव नलवडे यांचा सन्मान**

गावातील जल जीवन मिशन योजनेसाठी स्व स्वर्चातून सुमारे तीन लाख खर्चाची इलेक्ट्रिक डी पी दिल्या बद्दल माजी सरपंच पोपटराव नलवडे यांचा खा निलेश लंकेआणि आ.रोहित पवार यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

## 'आरंभ'चे समाज कार्य कौतुकास्पद : पो.नि. महेश पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**जामखेड** : आपण समाजाचे देणं लागतो. समाजात घडणाऱ्या चांगल्या गोष्टीचे समर्थन करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आरंभ फाउंडेशन ने घेतलेला गणेशोत्सवानिमित्ताने महाप्रसाद वाटप करून पुढाकार करीत असलेले सामाजिक कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व आरंभ फाउंडेशनच्या वतीने कर्जत जामखेड चे आमदार रोहित पवार मित्र मंडळ व बाफना उद्योग समूहाचे आकाश बाफना यांच्या सहकार्यातून शहरातील लोकमान्य वाचनालय येथे गणेशोत्सवानिमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी पोलीस निरीक्षक महेश पाटील, यांच्या हस्ते नारळ फोडून महाप्रसादाचे नायब तहसीलदार मनोज भोसेकर,शिवसेना तालुकाप्रमुख प्रा कैलास माने, उद्योजक आकाश बाफना, सुंदरदास बिरंगळ,डॉ भास्कर मोरे,प्रहार संघटनेचे ता.अध्यक्ष नय्युम सुभेदार, समता ग्रुपचे अध्यक्ष संतोष गव्हाळे, अभिजित राळेभात, विशाल अब्दुले, विनायक राऊत, गफ्फार पठण,अन्सार पठाण,डॉ सुरेश काशीद,पै उल्हास माने,सतीश पवार,निलेश तवटे,विशाल लोळगे, उद्योजक अरुण लटके आदींसह आरंभ फाउंडेशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी महाप्रसादाची सुरवात ब्राह्मनाथ सेवा प्रसार शिक्षण मंडळाचे निवासी मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थीपासून करण्यात आली यावेळी जवळपास एक हजार नागरिकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला आरंभ फाउंडेशनचे हे तीसरे वर्ष आहे फाउंडेशच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवून समाज हिताचे कार्य केले जाते या उपक्रमाला सर्व स्तरातून प्रतिसाद मिळत आहे.

## प्रा. सुलतान शेख हे गुणवंत सह-शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**शेवगाव** : शेवगाव तालुक्यातील लाडजळगांव येथील रहिवासी असलेले प्रा. सुलतान फतरुभाई शेख सर यांना नुकताच पुणे येथे सावित्रीबाई फुले सभागृहात झालेल्या संघटनेच्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य शिक्षक लोकशाही आघाडी प्रणित पुणे शहर माध्यमिक शिक्षक संघ यांच्याकडून दि. १४ रोजी शनिवारी गुणवंत सह-शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. सुलतान फतरुभाई शेख यांचा लाडजळगांव ग्रुप ग्रामपंचायत या ठिकाणी लोकनियुक्त सरपंच अंबादास ढाकणे याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी लाडजळगाव सेवा सोसायटीचे चेअरमन केदार पाटील, आबासाहेब वैद्य, अर्जुन ढाकणे, विजू नाना साळवे, भगवान पाटील, आशोक क्षीरसागर, दीपक तहकिक, ग्रामपंचायत सदस्य वसंत वीर, सामाजिक कार्यकर्ते मुन्नाभाई शेख यांच्यासह आदी ग्रामस्थ उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**
**वनविभाग अहमदनगर प्रा.**
**वनपरिक्षेत्र अधिकारी कर्जत प्रा.**
ईमेल : rfokarjat777@gmail.com

**ब - १ निविदा सुचना क्र. १ सन-२०२४-२५**

उपवनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी कर्जत, प्रा. हे महाराष्ट्र शासनाकडील ऊचित वर्गवारीतील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मृद व जल संधारण कामाच्या सीलबंद ब-१ निविदा मागवित आहोत. कोऱ्या निविदेचा नमुना या कार्यालयाकडे दिनांक-१७/०९/२०२४ ते २४/०९/२०२४ अखेरपर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत देण्यात येतील. या कार्यालयाकडे भरून पाठविण्यात आलेल्या निविदा वन परिक्षेत्र अधिकारी कर्जत प्रा. यांचे कार्यालयात दिनांक-२४/०९/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकृत करण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उपस्थित ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील. निविदा स्विकृतीचे अधिकार वन परिक्षेत्र अधिकारी, कर्जत प्रा. यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**❊ अटी व शर्ती :** १) वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात नोटीस बोर्डावर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल. वनपरिक्षेत्र अधिकारी यांना विनंती केल्यास नोटीशी प्रत विनामुल्य मिळु शकेल.२) सदर निविदांसाठी शासन निर्णय क्र. निविदा ०४१७/प्र.क्र.२४७ / मां.प्र.-१/दिनांक ३०/१०/२०२३ मधील तरतुदी लागू राहतील. ३) कोऱ्या निविदा संचाची मागणी करताना अर्जासोबत निविदा फीची दुय्यम पावती व कंत्राटदाराचा अर्ज नोंदणी प्रमाणपत्र यांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. ४) ठेकेदाराने दिलेल्या दराची विधी ग्राह्यता ६० दिवसापर्यंत राहील. ५) इसाऱ्याची रक्कम राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेडयुल बँकेची सहा महिन्याची मुदत ठेव पावती वनपरिक्षेत्र अधिकारी कर्जत प्रा. यांचे नावाने सादर करावी. ६) कोणतीही / कोणत्याही अगर सर्व निविदा नाकारणेचा वा रद्द करणेचा अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी कर्जत प्रा. यांनी राखुन ठेवला आहे. ७) वनपाल/वनरक्षक व सबंधित कंत्राटदार यांनी क्षेत्रिय कामाची संयुक्त स्थळ निरिक्षण केल्याचे (जीओटॅगींग) वनपाल यांनी दिलेले प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

**वनपरिक्षेत्र अधिकारी**
**कर्जत प्रा.**

रजि. नं. ए. एन. आर. आर. एस. आर. / ३७३/७२ रजि. ता. २८/०७/१९७२

**कर्जत तालुका विविध कार्य. सह. ग्रामोद्योग संघ मर्यादित, कर्जत ता. कर्जत, जि.अहमदनगर**

जावक क्रमांक. वार्षिक सभा / अजेंडा / २०२४/ दिनांक ०५/०९/२०२४

**वार्षिक सर्वसाधारण सभा**

संस्थेच्या सर्व सभासदांना विनंतीपूर्वक कळविण्यात येते की कर्जत तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघ मर्यादित कर्जत या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २३/०९/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात संस्थेचे सभासद **श्री. भिमराव रामचंद्र साळवे** यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती

**सभेपुढे येणारे विषय** : १) मा. नियोजित अध्यक्ष साहेब यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्यास विनंती करणे, २)मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे, ३) संस्थेवर तात्पुरत्या स्वरुपात सचिवाची नेमणूक करणे व त्याचे मानधन ठरविणे बाबत, ४)सन २०२३-२०२४ मध्ये झालेला खर्चास मंजुरी देणे, ५) सन २०२४- २०२५ या वर्षाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे, ६)संस्थेचे सन २०२३-२०२४ च्या शासकीय लेखा परीक्षण अहवालाचे वाचन करणे, ७)संस्थेचे सन २०२४-२०२५ च्या लेखा लेखापरीक्षनाकरिता लेखापरीक्षकाची नेमणूक करणे, ८) संस्थेच्या थकीत कर्ज वसुली बाबत विचारविनिमय करणे, ९) सन २०२३-२०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाच्या हिशोब पत्रकाचे वाचन करून मंजूर करणे, १०) संस्थेच्या जागेवर नवीन इमारत बांधणे बाबत विचारविनिमय करणे, ११) संस्थेचे गोडाऊन दुरुस्त करून भाड्याने देणे बाबत विचार विनिमय करणे, १२) माननीय अध्यक्ष साहेब यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

**: आपले नम्र :**

**श्री कदम रोहन किसन** — व्हाईस चेअरमन
**श्री सुरवसे महादेव रामभाऊ** — चेअरमन

**: सन्माननीय संचालक मंडळ :**

श्री साळवे रामकिसन माणिक, श्री पवार प्रभाकर विठ्ठल, श्री साळवे रामचंद्र कोंडीराम
श्री उदमले हरिदास हबाजी, श्री भैलुमे अंकुश रामदास, श्री खंदारे महादेव शिवराम
सौ. डमरे छाया मोहन, सौ.बोराडे वैशाली कैलास, सौ. माने राधा संतोष

**टीप :** १) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सदर सभा घेण्यात येईल त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही. २)ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाविषयी काही विधायक सूचना अगर ठराव मांडावायचे असल्यास त्यांनी तीन दिवस अगोदर संस्थेचे सचिव अथवा चेअरमन यांच्याकडे लेखी स्वरूपात आणून द्यावे ऐनवेळी येणारे ठराव स्वीकारले जाणार नाही.


# श्रीगोंद्यात आधार केंद्र बंद असल्याने गैरसोय

## शिष्यवृत्ती, सरकारी योजनांचा लाभ घेण्यात अडचणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यात तसेंच ग्रामीण भागात काही दिवसांपासून आधार सुविधा केंद्र सध्या बंद आहे.त्यामुळे नागरिकांची आधार अपडेट आणि नवीन कार्ड काढण्यासाठी गैरसोय होत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना आधार कार्ड काढणे अथवा नूतनीकरणासाठी मोठ्या प्रमाणात धावपळ करावी लागत आहे.होणाऱ्या गैरसोयीमुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

श्रीगोंदा शहरातील तसेच ग्रामीण भागात अनेक ठिकाणी आधार केंद्र सुरू होते. परंतु, गेल्या काही दिवसांपासून ते बंदच असल्याचे दिसून येत आहे. सध्या या परिसरात हे एकच केंद्र असल्याने नागरिकांना गैरसोयीस सामोरे जावे लागत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आधार कार्डमधील माहिती बदलासाठी तसेच, अद्ययावत अथवा नवीन आधार कार्ड काढण्यासाठी आधार केंद्रात येतात. मात्र, ते बंद असल्याने ज्येष्ठ नागरिकांना माहितीअभावी हेलापटे मारावे लागत आहेत.तसेच शालेय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना सरकारी योजनांचा लाभ घेण्यात मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या आहे त्यामुळे विनाकारण गैरसोय होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शासकीय आधार केंद्र बंद असल्याने ते कधी सुरु होणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. श्रीगोंद्यात त्यामुळे पुन्हा आधार केंद्र सुरू करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

### या कामासाठी लागते आधार !

नागरिकांना केंद्र, राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच बँकेत खाते काढण्यासाठी,विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम, बँक खात्यात जमा करणे,रेशन कार्ड सुविधा केंद्रातील विविध योजनांसाठी आधार नंबर असणे बंधनकारक आहे त्यामुळे आधारकार्डाची नितांत गरज भासते नागरीकातून बोलले जात आहे

### आधार केंद्र नसल्याने अनेक अडचणी : नागरिक

''श्रीगोंद्यात आधार केंद्र नसल्यामुळे आधार कार्ड काढण्यासाठी अथवा दुरूस्तीसाठी तालुक्याच्या बाहेरगावी अनेक ठिकाणी जावे लागते. यामुळे वेळ व पैसा वाया जातो. गावातील केंद्र लवकर करावे.''अशी मागणी नागरीकातून होताना दिसत आहे

# द • ख • ल

## भारतीय जनता पार्टीची जिल्हा संवाद बैठक



**वाघोली :** भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडी उत्तर पुणे जिल्हा पदाधिकाऱ्यांची संवाद बैठक शिरूर येथे नुकतीच पार पडली.या बैठकीसाठी प्रमुख मार्गदर्शक मा. विकास दादा जगताप प्रदेश उपाध्यक्ष व्यापारी आघाडी तसेच पुणे जिल्हा अध्यक्ष जयप्रकाशजी सातव पाटील यांनी सर्वांना विशेष मार्गदर्शन केले बैठकीचे आयोजन सुदर्शनजी दुगड यांनी केले होते.बैठकीचे सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस श्री सिद्धेशजी हिरवे यांनी केले.या बैठकीसाठी अनिल सोंडेकर,मनोज कांकरिया, किरण शिंदे,भालचंद्र निखळ, लक्ष्मणराव वाळके, तकटे, अशोक देशमुख, प्रवीण पाटील, हेमंत तकटे, अंकित भगत, पृथ्वीराज भोसले,या पदाधिकाऱ्यांसह अनेक व्यापारी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कवठे येमाईत दारुअड्ड्यांवर पोलिसांचा छापा

**तळेगाव ढमढेरे :** कवठे येमाई (ता. शिरुर) येथील चंदननगर व शितोळे वस्ती येथे काही इसम नागरिकांना गावठी दारुची विकी करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यांनतर सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक कारंडे, पोलीस हवालदार देविदास देविदास खेडकर, उमेश भगत, पोलीस शिपाई अंबादास थोरे यांनी तेथे जात छापा टाकला असता चंदननगर येथे निलेश बोडरे तर शितोळे वस्ती येथे चंद्रकांत शितोळे हा गावठी दारु विक्री करताना मिळून आला, दरम्यान पोलिसांनी दोन्ही ठिकाणचा दारुसाठा जप्त करत दोघांना ताब्यात घेतले, याबाबत पोलीस शिपाई अंबादास अश्रुबा थोरे (रा. शिरुर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी निलेश काळूराम बोडरे व चंद्रकांत तुकाराम शितोळे (दोघे रा. कवठे येमाई ता. शिरुर जि. पुणे) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार देविदास खेडकर हे करत आहे.

## बसमधून पडल्याने प्रवासी महिला जखमी, बसचालकावर गुन्हा

**तळेगाव ढमढेरे :** कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथे बस थांब्यावर प्रवासी बसमध्ये चढत असताना चालकाच्या चुकीमुळे बसमधून खाली पाडून प्रवासी जखमी झाल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे परमेश्वर दत्तात्रय शिंदे या पीएमटी बस चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोरेगाव भीमा (ता. शिरुर) येथील पीएमटी बस थांब्यावर वैशाली गुप्ता या थांबलेल्या असताना समोरून आलेल्या बसमध्ये त्या बसत असताना अचानक चालकाने बस भरधाव वेगाने पुढे नेल्याने वैशाली या तोल गेल्याने पाठीमागील दरवाजातून रस्त्यावर पडल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, याबाबत वैशाली सच्चिदानंद गुप्ता (वय २१ वर्षे रा. कोरेगाव भीमा ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी पीएमटी बस चालक परमेश्वर दत्तात्रय शिंदे ( पत्ता माहित नाही ) याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार सचिन मोरे हे करत आहे.

# गोळीबार करुन खुनाचा प्रयत्न करणारा लँड माफिया गजाआड

## उरुळी कांचन पोलिस ठाण्याच्या हद्दीत गोळीबार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**उरुळी कांचन :** आर्थिक देवाण – घेवाणीतून उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोळीबार करुन खुनाचा प्रयत्न करणारा लँड माफिया दशरथ उर्फ बापू शितोळेला रेल्वे रुळाच्या पलीकडे असलेल्या शेतातून ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून पोलिसांनी एक बंदुक, १७५ जिवंत काडतुस व पिस्टलचे ४० जिवंत काडतुस केले हस्तगत केले. याप्रकरणी एकूण ५ जणांवर गुन्हा दाखल केला आहे. स्थानिक गुन्हे अन्वेषण (ग्रामीण) व उरुळी कांचन ग्रामीण पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

आरोपी बापू उर्फ दशरथ विठ्ठल शितोळे (वय – ४६), निलीमा बापु उर्फ दशरथ शितोळे (वय – ४२), जिग्नेश बापु उर्फ दशरथ शितोळे (वय–१९), आशा सुरेश भोसले (वय–५२), निखील अशोक भोसले (वय– २५), सर्व रा. इनामदारवस्ती, कोरेगाव मुळ ता. हवेली) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयाने बुधवार (ता. १८) पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. अशी माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. पंकज देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी शेतकरी काळुराम महादेव गोते व शरद कैलास गोते (दोघे रा.बिवरी ता. हवेली) यांचे आरोपी बापू उर्फ दशरथ विठ्ठल शितोळे यांच्याशी आर्थिक व्यवहार होते. यामध्ये गोते यांचे शितोळे यांच्याकडे चाळीस लाख रुपये दीड वर्षापूर्वी दिलेले होते. काळुराम गोते यांना त्यांचे पैसे परत देतो माझ्या घरी या असे सांगितले होते.

घरी बोलावून पैसे परत मागितल्याच्या रागातून बापू शितोळे यांनी त्यांच्याकडील परवाना असलेल्या पिस्टल मधुन काळुराम गोते यांच्यावर जिवे ठार मारण्याचे उद्देशाने चार राउड फायर केले. यामध्ये काळूराम गोते यांना हाताला व पायाला गोळ्या लागुन गंभीर जखमी झाले आहेत.तर शरद गोते यांना मारहाण करण्यात आली.याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी घटनास्थळी भेट दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून स्थानिक गुन्हे शाखा, उरुळी कांचन पोलीस स्टेशन कडील वेगवेगळी पथके तयार करुन आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली. गोपनीय स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना एका खबऱ्याकडून माहिती मिळाली की, गुन्ह्यातील मुख्य आरोपी हा रेल्वे रुळाच्या पलीकडे असलेल्या शेतामध्ये लपुन बसलेला आहे. त्यानुसार पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. अधिक तपास केला असता सदर गुन्हा हा आरोपी बापु शितोळे यांने व त्याचे कुटुंबातील इतर सदस्यांनी केला असल्याची कबुली आरोपी शितोळे यांनी दिली.

**बापू शितोळे यांच्या बंगल्यातून १७५ काडतुसे जप्त...**

सदर गुन्ह्याचे अनुषंगाने आरोपी बापू शितोळे याचे बंगल्यातून १बंदुक व १७५ जिवंत काडतुस पिस्टलचे जिवंत ४० काडतुसे, दोन बॅरल, ०३ खाली मॅग्झीन जप्त करण्यात आले आहेत.




सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख, उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक राहूल गावडे, सपांगे, पोलीस उपनिरीक्षक अमित सिद–पाटील, काशीनाथ राजापुरे उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजीगिरे, स्थानिक गुन्हे शाखेचे अंमलदार बाळासाहेब कोरडे, सचिन घाडगे, अजित भुजबळ, असिफ शेख, योगेश नागरगोजे, मंगेश थिगळे, धीरज जाधव, विजय कांचन, विनोद पवार, स्वप्नील अहिवळे, बाळासाहेब खडके, उरुळी कांचन पोलीस ठाण्यातील अंमलदार अजित काळे, रमेश भोसले, प्रमोद गायकवाड, प्रवीण चौधर, मनिषा कुतवळ, यांनी केली असून पुढील तपास उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर पाटील हे करत आहेत.

# गणपती मिरवणुकीत हरवलेली मुलगी आईच्या स्वाधीन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सणसवाडी :** (ता. शिरुर) येथे गणपती विसर्जन मिरवणूक पाहण्यासाठी आलेली आणि गर्दीमुळे हरवलेली बालिका पोलीस हवालदार रविकिरण जाधव यांनी पालकांच्या स्वाधीन केली असून पल्लवी राजेंद्र पांडे असे त्या बालिकेचे नाव आहे.

सणसवाडी (ता. शिरुर) येथे गणपती विसर्जन मिरवणूक सुरु असताना घरापासून मिरवणूक पाहण्यासाठी चार वर्षीय पल्लवी आलेली असताना अंधारामध्ये ती चुकून रस्त्याने रडत इकडेतिकडे पळू लागली यावेळी येथील नागरिकांनी याबाबतची माहिती पोलीस हवालदार रविकिरण जाधव यांना दिल्यानंतर जाधव यांनी त्या बालिकेला जवळ घेऊन तिला खाऊ देत तिची विचारपूस केली, त्यावेळी तिने वडिलांचे नाव राजेंद्र पांडे असे सांगून ते भंगाराच्या दुकानात काम करतात असे सांगितल्याने जाधव यांनी त्या बालिकेला दुचाकीवर बसवून परिसरातील भंगारांच्या दुकानात जाऊन बालिकेच्या वडिलांचा शोध घेण्यास सुरुवात केली असता तब्बल एका तासाने एका दुकानातील कामगाराने त्या बालिकेला ओळखले आणि पोलीस हवालदार रविकिरण जाधव यांच्यासह तिच्या घरी जात पल्लवीला तिची आई रीना राजेंद्र पांडे यांच्या स्वाधीन केले. यावेळी तिच्या आईने आपल्या मुलीला पाहून पोलीस हवालदार रविकिरण जाधव यांना हात जोडत तुम हमारे लिये पोलीस नाही गणेशजी म्हणजेच गणपती बाप्पा असल्याची भावना व्यक्त करत त्यांचे आभार मानले, तर पल्लवी या बालिकेने ने रविकिरण जाधव यांना स्मितहास्य केले, तर बालिकेला सुखरूप आईच्या ताब्यात दिल्याचे समाधान सुद्धा पोलीस हवालदार रविकिरण जाधव यांच्या चेहऱ्यावर दिसून आले.



सणसवाडी (ता. शिरुर) येथे चुकलेल्या बालिकेला दुचाकीहून घेऊन पालकांच्या शोधात निघालेले पोलीस. (छायाचित्र आकाश भोरडे)

# वहिवाटीचे रस्ते खुले होण्यासाठी प्रयत्न करणार : पानमंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कवठे येमाई :** शिरूर तालुक्यातील चांडोह परिसरातील शिव,पाणंद,सर्व्हे नंबर,वहिवाटी चे रस्ते खुले होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे चांडोह येथील समन्वयक शांताराम पानमंद यांनी बोलताना व्यक्त केले. परिसरातील सर्व शेतकरी वर्गाला आवाहन करताना ते म्हणाले कि, भविष्यात शेत,बांधावरील, व इतर ही रस्त्यांचा प्रश्न मोठा गंभीर होणार आहे. आपल्या हक्काच्या रस्त्यासाठी नागरिक,शेतकऱ्यांनी जागृत होणे गरजेचे असून चांडोह गावातील शिव रस्ते,वहिवाटी चे रस्ते, सर्वे नंबर चे रस्ते असतील हे खुले होणे आज अत्यंत गरजेचे झाले आहे.नवीन शिव पानंद रस्ता चळवळीचे महाराष्ट्र प्रणेते शरद पवळे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती काम सुरु असून ज्या लोकांची रस्ता विषयी समस्या असेल त्या सर्वांना सूचित करण्यात येते कि,रस्त्याच्या अडचणी बाबत संबंधित प्रशासनांकडे रस्ता अडचण,मागणी विषयी अर्ज करणे गरजेचे आहे. आपला रस्ता खुला होणे साठी आपण केलेल्या अर्जाची पोच आपल्या जवळ असणे गरजेचे आहे.महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे राज्य समन्वयक शरद पवळे हे यासंदार्भात योग्य मार्गदर्शन करतील. शेतकऱ्यांना अडचणीचे ठरत असलेले रस्ते खुले होण्याकामी शासनाच्या वतीने पोलिस बंदोबस्त आणि रस्ता मोजणी नि शुल्क असल्याचे पानमंद यांनी सांगितले.



# तहसीलदार पाठीमागे लागताच वाळूमाफियांनी रस्त्यावरच टाकली वाळू

**पण काळ सोकावला नाही पाहिजे....**

सध्या घोड धरणात रात्रीच्या वेळेस बेकायदेशीररीत्या बेसुमार वाळू उपसा चालु असुन शिरुर तालुक्यातील चिंचणी, गुनाट, कुऱ्हाडवाडी तसेच श्रीगोंदा तालुक्यातील म्हसे, दाणेवाडी या गावातील वाळू माफिया मोठया प्रमाणात घोड धरणातुन वाळू उपसा करत असुन महसूल व पोलिस प्रशासनाला वाळू माफिया अजिबात जुमानात नाहीत. त्यामुळे 'म्हातारी मेल्याच दुःख नाही पण काळ सोकावला नाही पाहिजे' या म्हणीप्रमाणे महसूल विभाग आणि पोलिसांनी या वाळू माफियांवर संयुक्त कारवाई करणे गरजेचे असल्याचे मत सर्वसामान्य लोक व्यक्त करत आहेत.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शिरुर :** तालुक्यात वाळू माफियांचा आणखीन एक कारनामा समोर आला असुन शिरुरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी चिंचणी (ता. शिरुर) येथे बेकायदेशीर वाळूच्या गाडीचा पाठलाग करत असल्याचे लक्षात येताच. तहसीलदार पाठलाग करत असलेल्या रस्त्यावर वाळूचा हायवा खाली करुन पळ काढला आहे. त्यामुळे तहसीलदारांना वाळूच्या गाडीवर कारवाई करता आली नाही. त्यामुळे या मस्तवाल वाळू माफियांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

शिरुर आणि श्रीगोंदा तालुक्यातील हजारो हेक्टर शेतीला वरदान ठरलेल्या चिंचणी येथील घोड धरणातुन गेल्या दोन महिन्यापासुन कोणताही लिलाव झालेला नसताना रात्रीच्या वेळेस सुमारे ८ ते १० यांत्रिक बोटींच्या साह्याने बेकायदेशीर वाळू उपसा सुरु असुन याबाबत वेळोवेळी 'शिरुर तालुका डॉट कॉम' ने आवाज उठवला आहे. परंतु बेकायदेशीर वाळू उपशातुन मिळणाऱ्या पैशामुळे हे वाळू माफिया मस्तवाल झाले आहेत. त्यामुळे सध्या ते महसूल विभाग आणि पोलिसांनाही जुमनात नसल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

# शिक्रापूर पोलिस स्टेशनच्या गणपतीचे उत्साहात विसर्जन

## पोलिसांनी घेतला गणेशोत्सवाचा आनंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** पोलिसांना कोणतेच सण–उत्सव साजरे करण्याचा आनंद घेता येत नसतो, प्रत्येक वेळी कोणत्याही सण उत्सवा वेळी पोलिसांची सुट्टी देखील रद्द होत त्यांना बंदोबस्तावर हजर रहावे लागते. त्यामुळे सर्वत्र साजरा होत असलेल्या गणेशोत्सवाचा आनंद घेता यावा या उद्देशाने शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या पोलिसांनी पोलीस स्टेशन मध्ये बसवलेल्या गणपतीचे मोठ्या उत्साहात विसर्जन करत गणेशोत्सवाचा आनंद घेतला आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) पोलीस स्टेशन येथे सर्व पोलिसांच्या वतीने गणेशोत्सव साजरा करत गणपती बसवण्यात आलेला होता, त्यांनतर दररोज पोलीस अधिकारी, कर्मचारी, पत्रकार यांच्या हस्ते आरती करत गणेशोत्सव साजरा करण्यात आला, सध्या सर्वत्र गणेश विसर्जन कार्यक्रम सुरु होणार असल्याने पोलिसांना बंदोबस्तावर हजर रहावे लागणार आहे. त्यामुळे पोलीस स्टेशनच्या गणपतीचे विसर्जन आज करण्यात आले, यावेळी सर्व पोलिसांनी उपस्थित राहत फेटे बांधत गणपतीची पारंपारीक वाद्यांच्या तालात मिरवणूक काढत मोठ्या जल्लोषात गणपतीचे विसर्जन केले.

यावेळी पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप साळुंखे, राहुल देशमुख, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक रोहिणी सोनावले, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे, महेश डोंगरे, यांसह सर्व पोलीस अधिकारी कर्मचारी तसेच महिला कर्मचारी सहभागी झाले होते, दरम्यान अनेक पोलीस कर्मचाऱ्यांनी मिरवणुकीमध्ये नाचण्याचा आनंद घेतला तर सर्व पोलिसांना फेटे बांधलेले असल्याने आणि शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणूक निघाल्याने या मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते तर यावेळी बोलताना कोणताही सण उत्सवाचा आनंद आम्हाला घेता येत नसतो मात्र आज गणेशोत्सवाचा आनंद साजरा करता येत असल्याचे समाधान आम्हाला असल्याचे पोलिसांनी सांगितले.



गणेश विसर्जन मिरवणूकीत सहभागी पोलीस आणि ढोल वाजवण्याचा आनंद घेताना पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड. (छायाचित्र आकाश भोरडे)

# विसर्जनासाठी निर्माल्य संकलनाची व्यवस्था : मुख्याधिकारी रोकडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** श्री गणेश विसर्जनासाठी नगरपरिषदेकडून शहरातील विविध बत्तीस ठिकाणी कृत्रिम विसर्जन हौदासह निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आली आहे, नागरिकांनी पर्यावरणाच्यादृष्टीने त्याचा वापर करावा, असे आवाहन मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

शहरात सुमारे २०० पेक्षा अधिक सार्वजनिक गणेश मंडळांनी श्री गणेशाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. त्यामुळे गणेशमूर्तीची संख्या विचारात घेता प्रदूषण रोखण्यासाठी निर्माल्य व इतर कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन होण्यासाठी कृत्रिम विसर्जन हौदांची निर्मिती व निर्माल्य संकलनाची व्यवस्था केली आहे.

पर्यावरणपूरक विसर्जन मिरवणूक व विसर्जन करणाऱ्या मंडळांना यावर्षी नगरपालिकेच्या वतीने बक्षीसे जाहीर करण्यात आली आहेत.यामध्ये १५ हजार, १० हजार व ७ हजार रोख रक्कम प्रमाणपत्र व शिल्डचा समावेश आहे. डीजेमुक्त आणि पारंपरिक वाद्याच्या वापर करण्याबाबतची मुख्य अट ठेवण्यात आली आहेत.

गणपती विसर्जन विहिरीजवळ १० नियंत्रण अधिकाऱ्यांसह कर्मचारी व शहरातील ३२ ठिकाणी विसर्जनाच्या वेळी मदतीसाठी २०० कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. पर्यावरणपूरक व शांततेत पार पडणाऱ्या आणि नियमाच्या अधीन राहून विसर्जन मिरवणूक काढणाऱ्या तीन गणेश मंडळांना उत्कृष्ट गणेश मंडळ म्हणून प्रोत्साहन पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

गणपती विसर्जन मिरवणुकीसाठी सर्व मिरवणूक मार्गावर भाविकांच्या सोयीसाठी इतर अडथळे, झाडांच्या फांद्या, झाडे–झुडपे काढून घेण्यात आल्या आहेत.

घरगुती व सार्वजनिक मंडळांच्या गणपती विसर्जनासाठी शहरात व क्षेत्रीय कार्यालयांच्या कार्यकक्षेत कृत्रिम विसर्जन हौद व निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहेत. तसेच आवश्यकतेनुसार कॅनॉल व नदीपात्राच्याकडेला बॅरिकेडिंग उभे करण्यात आले आहेत. कॅनॉल व नदी पात्रात पूर्णवेळ सुरक्षेसाठी सतर्क असणार असून अग्निशमन विभागाचे पथक तैनात करण्यात आले आहेत.

# बिबट्याला जेरबंद करण्यासाठी ठोस उपाययोजनांची गरज

बिबट्याच्या हल्ल्याच्या अनेक घटना परिसरात घडत आहे . वन विभागाकडे बिबट्या पकडण्यासाठी लावण्यात येणारे पिंजरे फारसे उपलब्ध नसतात . शिरूर तालुक्यात अनेक गावांमध्ये बिबट्यांचा वावर दिसतोय . या समस्येवर पर्याय म्हणून प्रत्येक गावाने ग्रामपंचायतच्या माध्यमातून, किंवा ग्रामस्थांच्या मदतीमधून प्रत्येक गावाने पिंजरा खरेदी करावा . ज्या भागात बिबट्याचा वावर असेल, त्या भागात पिंजरा लावण्यात यावा. पकडलेले बिबटे वन विभागाच्या पिंजऱ्यामध्ये टाकून, बाहेर जंगलात सोडून द्यावे . गावाने स्वतः खरेदी केलेला पिंजरा गावच्या लोकांच्या फायद्यासाठी कायमस्वरूपी उपयोगात राहील. असे केल्यास बऱ्याच प्रमाणात बिबटे पकडले जातील. या संकटातून सुटका होण्यास सहकार्य होईल.

– शहाजी दळवी (समाजसेवक कान्हूर मेसाई)

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** शिरूर तालुक्यात बिबट्यानी शेतशिवारात ठाण मांडले असून, पारंपरिक शिकार मिळत नसल्याने पाळीव प्राण्यांपाठोपाठ त्यांनी माणसांवरही हल्ले सुरू केले असल्याने शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या एक ते दोन वर्षांपासून बिबट्यांनी पाळीव प्राण्यांवर अनेकवेळा हल्ले केल्याने मोठी दहशत माजली आहे.

सहसा दाट झाडीझुडपात लपूनछपून जीवन जगणारा बिबट्या अत्यंत 'छलिया शिकारी' समजला जातो. मिळेल त्या परिस्थितीत मिळेल ती शिकार करण्याचे कसब अंगी भिनलेले बिबटे जंगले नष्ट झाल्याने मोठ्या प्रमाणत विस्थापित होत आहेत. पोटाची भूक शमविण्यासाठी पारंपरिक शिकार मिळत नसल्याने ते साहजिकच मानवी वस्त्यांकडे आकर्षिले जात आहेत. मानवी वस्त्यांच्या सीमेवर येऊन मिळेल त्या भक्ष्याची शिकार करताना त्यांचा जगण्यासाठीचा संघर्ष आता आणखी कठीण होत चालल्याची लक्षणे दिसू लागली आहेत.

शिरूर तालुक्यातील बिबट प्रवण क्षेत्रात सायंकाळी अंधार गडद होऊ लागताच बिबट्यांचा मुक्त संचार सुरू होतो. हल्ल्याच्या भीतीने रहिवाशांना एकट्याने घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. वस्त्यांवरील पाळीव कुत्री, बकऱ्या, कोंबड्या, गायी, म्हशींची सहज शिकार मिळत असल्याने बिबटे आता मानवी वस्त्यांकडे आकर्षिले जात आहेत. त्यामुळे जांबुत, टाकळी हाजी, कवठे येमाई, मलठण, सविंदणे या भागात बिबट्यांची संख्या नेमकी किती असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. प्राणी व भक्ष्याच्या शोधात बिबटे मानवी वस्त्यांकडे आकर्षिले जात असून, मनुष्य जीवितालाही धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वनविभागाने लवकरात लवकर बिबट्या पकडण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी आशा नागरिक व्यक्त करत आहे.

**वसाहतीतील लोकांनी घ्यायची काळजी....**

शेतकऱ्यांनी पाळीव जनावरे शक्यतो बंदिस्त गोठ्यात बांधावीत. शेतात एकट्याने जाण्याची वेळ येईल त्यावेळी ध्वनिनाद निर्माण करीत जावे.बिबट्या शक्यतो उभ्या व्यक्तीवर हल्ला करीत नाही. तो खाली बसलेली, वाकलेली व्यक्ती म्हणजेच त्याच्या नजरेच्या टप्प्यातील आकृती यास तो सावज समजून हल्ला करू शकतो. त्यामुळे अशा परिस्थितीत वाकणे, खाली बसणे टाळा.



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

सर्व प्रकारच्या प्रिंटींगच्या कामांसाठी संपर्क करा..
श्रीरामपुरात प्रथमच.!
साईवेद प्रकाशन
4 Colour Printing
CTP पासून बाईंडींगपर्यंतच्या.. सर्व सुविधा एकाच ठिकाणी
* थर्मल सीटीपी * कोमोरी लिथेरॉन ऑफसेट-20x28
* प्रोग्रामेबल कटींग मशीन-45" * लॅमिनेशन * क्रिझींग * हाफ कटींग
* फोल्डींग * पिनिंग *परफेक्ट बाईंडींग *पॅकेजिंग प्रिंटींग *४ कलर न्यूज पेपर प्रिंटींग
साईवेद प्रकाशन, एक्स-२९, एस.टी.कार्यशाळेमागे, एम.आय.डी.सी.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर-४१३७०९, ०२४२२-२१००१८ मो. ७७७४००१८१८
saived.print@gmail.com



## अनोळखी महिलेचा मृतदेह आढळला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**घोडेगाव** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव जवळील झापवाडी येथे अनोळखी महिलेचा मृतदेह आढळल्याने परिसरासह तालुक्यात एकच खळबळ उडाली असून मयत महिलेची आत्महत्या की घातपात अद्याप समजू शकले नाही.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की अहमदनगर छत्रपती संभाजी नगर मार्गावरील घोडेगाव पासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या झापवाडी शिवारात मुळा उजव्या कालव्यालगत असलेल्या आपल्या शेताला चक्कर मारण्यासाठी गेलेल्या अशोक नामदेव शिंदे यांच्या उसाच्या शेताजवळ सकाळी दहा वाजेच्या सुमारास एक अनोळखी महिला अंदाजे साठ वर्ष नऊवार साडी घातलेली केसाला लाल रंग लावलेला उजवे हातावर तुळशीचे पान डाव्या हाताच्या मनगटाजवळ किसन नाव गोंधलले आहे. गळ्यात स्कार्फ व त्यावर लाल रंगाचे फुले असलेले महिलेचा मृतदेह आढळून आला. शिंदे यांनी सदर बाब ताबडतोब सोनई पोलीस ठाण्याला कळवल्या बरोबर सानईचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल होऊन मृतदेहाची व परिसराची पाहणी करून सदर महिला कोणाच्या ओळखीची असल्याबाबत विचारपूस केली. दरम्यान शेवगाव पोलीस उपविभागीय अधिकारी सुनील पाटील तसेच स्थानिक गुन्हे शाखेच पथक हेही घटनास्थळी दाखल झाला. महिलेच्या अंगावर मारहाणीच्या जखमा असून सदर घटना घातपात असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला असून त्यानुसार पोलीस तपास करत आहेत सदर घटनेबाबत सोनई पोलिसात अकस्मात मूर्तीची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे करत आहेत सदर महिला कोणाच्या ओळखीची असल्यास तात्काळ सोनई पोलीसांना संपर्क करण्याचे आवाहन सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्य पोलीस निरीक्षक विजय माळी यांनी केले आहे.

## चांदा येथे गोमास पकडले; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील चांदा येथे दोन क्विंटल गोमासांसह ६ जिवंत जनावरे ताब्यात घेऊन ६ लाख पाच हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याबाबत स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या वतीने ही कारवाई करण्यात आली.



यांप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर हे गणेश उत्सवाच्या निमित्ताने हद्दपार झालेल्या लोकांची व बंदोबस्ताची माहिति घेत असताना त्यांना गुप्त बातमीदाराच्या मार्फत बातमी मिळाली की, कैफ कुरेशी व मोसीन बशिर कुरेशी राहणार कुरेशी मोहल्ला चांदा येथे राहत्या घरात महाराष्ट्र राज्यामध्ये गोवंशी जनावरांचे कत्तल करण्याची मनाई असताना ही गोवंशी जातीचे जिवंत जनावरांना अमानुषपणे वागवून देवुन त्यांना विना चारा व पाण्याचे ताब्यात ठेवून त्याची कत्तल करत आहे तेथे सापळा लावल्यास मिळुन येईल अशी बातमी मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी पोलीस उपनिरीक्षक तुषार धाकराव, पोहेकॉ विश्वास अर्जुन बेरड, पोहेकॉ बाळासाहेब भागुजी पालवे,पोहेकॉ संतोष शंकर लोढे, पो. हे.कॉ. ज्ञानेश्वर नामदेव शिंदे, पोना सोमनाथ झांबरे, पो कॉ.बाळु सुभाष खेडकर, पो.कॉ. किशोर आबासाहेब शिरसाठ चालक पो. कॉ.अरुण भिमराव मोरे अशा कर्मचाऱ्यांना तात्काळ सदर ठिकाणी कारवाई करण्यासाठी तोंडी आदेश दिले होते.स्थानिक गुन्हे शाखेचे पथक सरकारी वाहन व एक खाजगी वाहनाने निघून बातमीतील नमुद ठिकाणी कुरेशी मोहल्ला चांदा तालुका नेवासा जि. अ.नगर बातमीतील नमुद ठिकाणी ठिक २१/४५ वा. सुमारास छापा टाकला असता सदर ठिकाणी काही इसम गोवंशी जनावराची कत्तल करीत होते. त्यावेळी त्यातील दोन इसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले व एका इसमास पोलिसांनी जागीच पकडुन त्यांना आम्हां पोलीसाची व पंचाची ओळख सांगुन पंचासमक्ष त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव आलीम गुलाम गोस शेख वय ३८ वर्षे रा. चांदा ता. नेवासा यास जागीच पकडुन त्याला पळुन गेलेल्या इसमाचे नाव गाव विचारले असता त्याने त्यांचे नाव मोहमंद कैफ शेख, मोसीन बशिर कुरेशी दोघे राहणार चांदा तालुका नेवासा असे असल्याचे सांगीतले.सदर कत्तल केलेल्या ठिकाणची व जिवंत जनावरे बांधून ठेवलेल्या ठिकाणीची पाहणी केली असता सदर ठिकाणी उभे असलेली पांढऱ्या रंगाची महिंद्रा कंपनीचा पिकअप क्रमांक चक १६ -ए ६३४० अशी उभी होती त्यामध्ये खालील वर्णनाच्या व किंमतीच्या गोवंशं जातिचे जनावारे दाटी रेटीत बसवलेले व कापलेले जनावरांचे गोमांस मिळुन आले त्याचे वर्णन खालील प्रमाणे२००किलो वजनाचे कापलेले जनावरे गोमांस किंमत अंदाजे प्रति किलो २००रु प्रमाणे ४०,०००/-,काळ्या पांढऱ्या रंगाची गाय जर्शी शिंगे नसलेली किं.अंदाजे १५,०००/-, पाढऱ्या रंगाची खिलारी जातीचा बैल शिंगे असलेला कि.अं.२५,०००/- काळ्या पांढऱ्या रंगाची जर्शी कालवड किंमत अंदाजे १०,०००/- तांबड्या व पांढऱ्या रंगाचे दोन गोन्ड कि.अंदाजे १०,०००/-, जर्शी कालवड कि.अंदाजे ५ हजार, पांढऱ्या रंगाचा महिंद्रा कंपनीचा पीकअप क्रमांक चक१६ मह्न ६३४०जु.वा. कि.अं.६ लाख पाचहजार असे एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दिनांक १५ सप्टेंबर रोजी २१.४५ वा. सुमारास १) आलीम गुलाम गोस शेख वय ३८ वर्षे रा. चांदा ता. नेवासा २) मोहमंद कैफ शेख (फरार) ३) मोसीन बशिर कुरेशी (फरार) दोघे राहणार चांदा तालुका नेवासा सर्व राहणार चांदा तालुका नेवासा हे महाराष्ट्र राज्यामध्ये गोवंशी जनावरांचे कत्तल करण्याची मनाई असतांना ही गोवंशी जातीचे जिवंत जनावरे डाबून ठेवून त्यांना अमानूषपणे वागवून त्यांना विना चारा व पाण्याचे ताब्यात ठेवून त्याची कत्तल करतांना मिळून आले वरील सर्व आरोपींच्या विरुध्द भा. न्याय संहिता २०२३ कलम २७१, ३ (५) महाराष्ट्र पशुसंरक्षण (सुधारणा) अधिनियम सन १९९५ चे कलम ५ (अ) (ब) (क) ९ व प्राण्याना निर्दयतेने वागवण्यांचे कलम ३,११ प्रमाणे फिर्याद दाखल करून आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे नेवासा -शेवगाव चे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अहमदनगर स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचारी यांनी केली

## गुप्ती घेऊन फिरणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातून जाणाऱ्या नगर - दौंड रोडवर निमगाव खलु गावचे जवळ असणाऱ्या टोलनाक्याजवळ विना नंबरच्या चारचाकी वाहनातून गुप्ती (तलवार) घेऊन फिरणाऱ्या तिघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या सगळीकडे गणेशउत्सवाची धामधूम सुरु आहे याचा पार्श्वभूमीवर श्रीगोंदा पोलिसकडून पेट्रोलिन्क चालू असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली कि श्रीगोंदा तालुक्यातून जाणाऱ्या नगर -दौंड रोडवरील निमगाव खलु गावच्या हद्दीमधील टोलनाक्याजवळ काही अज्ञात लोक विना नंबरच्या गाडीत गुप्ती (तलवार) घेऊन फिरत आहेत त्यानुसार निमगाव खलु शिवारात काष्टी ते दौंड जाणारे रोड वरील टोल नाक्या जवळ पोहोचल्यावर माहितीनुसार मिळालेल्या ठिकाणाचे अलीकडे गाडी उभी करून पोलिसांनी प्रथम खात्री केली असता टोल नाक्याचे अलीकडे एक विना नंबरचे सिलवर रंगाचे स्वीट गाडी थांबलेली दिसली सदर ठिकाणी अचानक जावुन सदर थांबलेल्या गाडीतील इसमांना पकडण्याचा प्रयत्न केला असता त्या गाडीतील दोन इसम पळुन गेले एका इसमास जागीच पकडुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव गणेश कमादास दरेकर वय ३० रा. गोपाळवाडी, दौंड ता. दौंड जि. पुणे असे असल्याचे सांगीतले त्यास पळुन गेलेल्या इसमांचे नाव गाव विचारले असता त्याने त्यांची नावे कुनाल मारुती दरेकर रा. गोपाळवाडी, व स्वप्नील जावध रा. अजनुज ता. श्रीगोंदा असे असल्याने सांगीतले तसेच सदर विना नंबरची गाडी बाबत विचारणा केली असता सदर विना नंबरधी स्वीप्फट गाडी त्याचीच असले बाबत सांगीतले, त्यास पोलिसांची व पंचांची ओळख करुन देवुन त्याची व गाडीची झडती घेतली असता सदर स्वीफ्ट गाडीची ड्रायव्हर सीटचे एक गुप्ती चाकु मिळुन आला त्याचे वर्णन खालील प्रमाणे सुमारे ५०० रुपये किमतीची २.३ सेटी मिटर व्यायाचे काळे रंगाचे पाईप मध्ये गोल आकाराची सुमारे ५.७ इंच लांबीची स्टीलची मुठ व सुमारे १९.५ इंच लांबीची दोन से. मी. रुंदीचे, पुढील बाजुस निमुळते टोकदार आकाराचे पाते असलेली तलवार तलवारीचे पात्यावर इग्रंजीमध्ये इ-ढजछ डथजठऊ असे लिहीलेली तलवार मिळून आली आहे त्यानुसार यामध्ये श्रीगोंदा पोलीस स्टेशसनला स्वात पोलीस हेडकॉन्स्टेबल गुलाब उत्तम मोरे याच्या फिर्यादीवरून गणेश कमादास दरेकर वय ३० रा. गोपाळवाडी, दौंड ता. दौंड जि.पुणे, कुनाल दरेकर रा. गोपाळवाडी, व स्वप्नील जावध रा. अजनुज ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर असे विना परवाना विना नंबरचे मारुती स्वीफ्ट गाडी मध्ये वरील वर्णनाची तलवार स्वताचे कब्जात बाळगतांना मिळुन आले भारतीय शश्त्र अधि कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दखल करण्यात आला.

## शेतकऱ्यांचे शेतीपंप चोरणाऱ्या आरोपींना पोलिसांनी केली अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : तालुक्यातील नायगाव येथील शेतकऱ्यांच्या शेतातील पाणी उपसा करणारे सिंचन पंप चोरी गेले म्हणून खर्डा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला.



खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांनी गुन्ह्याचा तपास अतिशय योग्य पद्धतीने हाताळून आरोपींचा छडा लावण्यात यश मिळवले. त्यांना गोपनीय माहितीद्वारे माहिती मिळाली, सदरचा गुन्हा स्थानिक रहिवासी राजेंद्र बाळू ससाने, ऋषिकेश बाळासाहेब जाधव राहणार नायगाव ता. जामखेड यांनी केलेला आहे, सदर मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने नमूद आरोपींचा शोध घेऊन त्यांना तात्काळ अटक करून तपास केला असता त्यांनी सदर गुन्ह्याची कबुली देऊन दाखल गुन्ह्यात चोरीस गेलेले चार सिंचन पंप चोरले असल्या बाबतची कबुली दिल्याने दाखल गुन्ह्यातील आरोपींकडून तपासामध्ये एकूण चार शेती सिंचन पंप मोटार व गुन्हा करताना वापरलेली मोटरसायकल असा एकूण ३८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदर गुण्याच्या संदर्भात खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक झंजाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ना. संदीप धामणे, पोलीस कॉ. प्रवीण थोरात, पोलीस कॉ. गणेश बडे हे करीत आहेत.

## आ. काळेंच्या उपस्थितीत कोल्हे गटाच्या कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदार संघाच्या विकासासाठी ३००० कोटीच्या वर निधी आणून मतदार संघाचा सर्वांगीण विकास साधत हा विकास मतदार संघातील जनतेच्या दारापर्यंत पोहोचला आहे. त्याचबरोबर मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या आमच्या जीवन मरणाचा अर्थात मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचा प्रश्न आ. आशुतोष काळे यांनी सोडविला आहे. त्यामुळे त्यांना यापुढे राजकीय विरोध करणे चुकीचे आहे हि आमच्या अंतर्मनाची भावना असल्याचे सांगत मंजूर येथील भाजप-कोल्हे गटाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी नुकताच आ. आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला.



आ. आशुतोष काळे यांनी मंजूर येथे विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेवून नागरिकांशी संवाद साधला. यावेळी उत्स्फुर्तपणे कोल्हे गटाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त करून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. त्यामुळे कोल्हे गटाच्या चिंता अधिकच वाढल्या आहेत. आ.आशुतोष काळे यांनी विकास कामे करत असतांना मतदार संघातील प्रत्येक गावाला न्याय दिलेला आहे. मतदार संघातील मोठ्या प्रमाणात विकासाचे प्रश्न कित्येक वर्षांपासून प्रलंबित असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत होता आणि ते प्रश्न फक्त आ.आशुतोष काळेच सोडवू शकतात असा विश्वास देखील नागरिकांना होता.सत्ताधारी पक्षाचा आमदार कशा प्रकारे विकासकामे करू शकतो याचा आदर्श तयार करून हे सर्वच प्रश्न आ.आशुतोष काळे यांनी निकाली काढले आहेत. त्यामध्ये मंजूर येथील गोदावरी नदीवरील असलेला बंधारा हा एकोणीस वर्षात ३ वेळेस वाहून गेला होता आणि त्यामुळे परिसरातील शेती व शेतकऱ्यांचे भविष्य अंधकारमय झाले होते. शासन स्तरावर आ.आशुतोष काळे यांनी वेळोवेळी पाठपुरावा करत मंजूर बंधारा दुरुस्ती कामाकरीता ४१.५१ कोटींचा निधी मंजूर करून आणला आहे. तसेच मंजूरचे प्रसिद्ध श्री सिद्धेश्वर देवस्थानचा विकास, देर्डे फाटा-मोर्विस (सात मोऱ्या) रस्ता आदी प्रमुख विकास कामांसह अंतर्गत रस्ते व विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिला असून यातुन अनेक कामे पूर्ण झाली आहेत तर काही कामे प्रगतीपथावर आहेत.

प्रवेश केलेल्या कोल्हेंच्या कार्यकर्त्यांमध्ये संभाजीराव तांगतोडे, राघव तांगतोडे, विजय वालझडे, अमोल तांगतोडे, वाल्मिक तांगतोडे, सागर तांगतोडे, विनायक पायमोडे, राजेंद्र गावंड, मयुर कदम, सागर कदम, शुभम कदम, गणेश शेटे, सोमनाथ बर्डे, अनिल पवार, भागवत पवार, सोमनाथ पवार, सुभाष पवार, ज्ञानेश्वर बर्डे, भाऊसाहेब निकम, सर्जेराव बर्डे, नवनाथ बर्डे, चांगदेव बर्डे, अशोक बर्डे, किशोर भवर, बाळासाहेब गांगुर्डे, सुनील मोरे, राहुल पवार, रमेश पवार, चंद्रभान बर्डे, संदीप मोरे, बाळासाहेब वाघ आदींनी राष्ट्रवादी प्रवेश केला.

## महावितरणच्या गलथान कारभारामुळे बैलाचा तडफडून मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : तालुक्यातील बाभुळगाव नांगरे येथील शेतकरी शिवाजी संपत सोनवणे यांच्या (गट नंबर ५५) मध्ये बैलाला विजेचा धक्का लागल्याने तडफडून बैलाचा जागीच मृत्यू झाला तर दैव बलवत्तर म्हणुन शेतकरी शिवाजी सोनवणे वं त्यांचा दुसरा बैल या धक्क्यातून वाचला.



गंगापूर तालुक्यातील बाभुळगाव येथे शेतकरीशिवाजी सोनवणे हे त्यांच्या गट नंबर मध्ये बैल चारीत होते येथील विद्युत ट्रांसफार्मरला जोडणारी तार तुटली होती तार तुटल्यामुळे याचा विद्युत प्रवाह सर्व ट्रांसफार्मर मध्ये उतरला होता बैल चरत असताना ट्रांसफार्मर ला दिलेल्या तानाला बैलाचा स्पर्श झाला यातच बैलास विजेचा धक्का बसला यात बैलाचा जागीच तडफडून मृत्यू झाला. तालुक्यात अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मरचे उघडे बॉक्स तसेच तारा लोंबकळत असल्याने महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे आतापर्यंत अनेक शेतकरी व जनावरांना अखेरचा निरोप घ्यावा लागला यास जबाबदार कोण असा प्रश्न शेतकऱ्यांमधून उपस्थित होत आहे. तालुक्यातील सर्व ट्रांसफार्मर व विद्युत खांब तसेच लोंबकळणाऱ्या ताराची दुरुस्ती करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून करण्यात येत आहे. दरम्यान यावेळी शेतकरी कृती समितीचे इंजी.महेशभाई गुजर,शिवसेना जिल्हाउपप्रमुख नितीन कांजुने, बाभुळगाव ग्रामपंचायतचे राहुल थोरात,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आदेश रनयेवले,पशु वैद्यकीय सहाय्यक शेलार, दिनकर सोनवणे, विलास एकनाथ सोनवणे,राजू जाधव, किशोर सोनवणे,सचिन सोनवणे, गोकुळ जाधव, सुनील गोरे, सचिन अंबादास चव्हाण, कचरू भानदास जाधव, गणेश राऊत,आदीची उपस्थिती होती. दरम्यान पशुवैद्यकीय अधिकारी शेलार यांनी पंचनामा केला असून यांनी पंचनामा करून पोस्टमार्टम केले आहे.

डोणगाव पशुवैद्यकीय रुग्णालयातील पशुवैद्यकीय अधिकारी यांची बदली झाली असल्याने नविन पशुवैद्यकीय अधिकारी महाशिकरे हे रुजू झाले नसल्याने डोणगाव मंडळात नैसर्गिक आपत्ती काळात अधिकारी नसतील तर येणाऱ्या काळात मोठा अनुचित प्रकार झाला तर जबाबदारी नेमकी कोणाची असा सवाल इंजी.महेश गुजर यांनी उपस्थित केला आहे.

## जुन्या विचारसरणीचा आधारवड हरपला!

कै. दादाभाऊ नामदेव मोरे यांचे रविवार दिनांक ८ सप्टेंबर २०२४ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांचे निधन सगळ्या नातेवाईकांना व गावाला चटका लावून गेले. सडसडीत व काटक देहयष्टी, रंग गोरा, डोक्यावर लाल किंवा पांढऱ्या रंगाचा पटका, तर कधी गांधी टोपी, अंगात नेहरू व खाली धोतर असा पेहराव असणारे हे व्यक्तिमत्व.

कै .नामदेव मोरे यांना चार मुले व तीन मुली असा परिवार. जुन्या काळातील सातवी शिकलेले परंतु मनमिळावू अत्यंत हुशार व सत्यवादी. त्या काळात प्राथमिक शिक्षक होणे अजिबात अवघड नव्हते. परंतु काळ्याआईची सेवा करणे त्यांनी पसंत केले. त्यांचा पंचांगणाचा अभ्यासही खूप मोठा होता.

मोठे कुटुंब म्हणून शेतीची सर्व जबाबदारी त्यांच्यावर होती. करकंडे कुटुंबातील पारूबाई यांच्याशी दरम्यानच्या काळात त्यांचा विवाह झाला.पितृछत्र हरपल्यानंतर व एक भाऊ पण लवकरच गेल्याने संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी स्वतः च्या खांद्यावर पडली.एकटेच घरात शिकलेले. कधी स्वतः चाच संसार केला नाही. सर्व भाऊ आणि बहिणीच्या संसारात सुद्धा मोठा हातभार लावला. भावाच्या व बहिणींच्या मुलांची लग्न जमवणे, त्यांना पायावर उभे करणे यासारखी जबाबदारीची कामे केली.



या कुटुंबाचे एक सर्वात मोठे वैशिष्ट्ये म्हणजे गावातील मुलांना शिकण्यासाठी रयत शिक्षण संस्थेच्या मार्फत सुरू झालेल्या जनसेवा विद्यालय वडझिरे या शाळेला आपली पाच ते सहा एकर जमीन दान केली. आज वडझिरे नव्हे तर पंचक्रोशीतील अनेक मुले या शाळेत शिकून वेगवेगळ्या क्षेत्रात काम करत आहेत. अनेक मोठे अधिकारी झाले आहेत.

गावच्या विकासात सुद्धा त्यांचा मोठा हातभार आहे. कधी राजकारण केले नाही परंतु समाजकारण मात्र निश्चित केले. कर्तृत्व,नेतृत्व आणि दातृत्व या कुटुंबाची त्रिसूत्री.

मामांना दोन मुले, दोन सुना व तीन मुली ,नातवंडे असा मोठा परिवार. मामाने मुलांच्या शिक्षणावर भर दिला.थोरल्या मुलाला इंजिनियर बनवले. तर दुसऱ्या मुलाला एम .कॉम. शिक्षण दिले. थोरला मुलगा पाटबंधारे विभागात निवृत्त उपविभागीय अभियंता तर दुसरा मुलगा उत्तम शेती करतो. नातवंडे इंजिनियर होऊन विविध पदावर कार्यरत आहेत. थोरल्या सुनबाई सौ. मंदाकिनी देवराम मोरे या आज वडझिरे गावची ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सेवा करत आहेत. तर संपूर्ण कुटुंब ही समाजाची बांधिलकी सांभाळत आहे.

दोन्ही मुलांनी आपल्या आई-वडिलांची सेवा अत्यंत चांगल्या पद्धतीने केली. दोन भाऊ व तीन बहिणी व पत्नीचे निधन झाल्यानंतर खचले. परंतु संस्कारी मुले व सुना तसेच नातवंडांनी त्यांची खूप सेवा केली.शेवटपर्यंत ठणठणीत राहिले. आपण आमच्यातून शरीराने गेले असले तरी आपले विचार नेहमी आम्हाला प्रेरणादायी असतील.

आपले अस्तित्व आमचा एक आधारवड म्हणून कायम असेल. त्यांच्यात दिव्यत्वाचा अंश होता म्हणूनच म्हणावेसे वाटते कि, 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती'. तुकाराम महाराजांनी यतार्थ म्हटले आहे की,

नाशवंत देह जाणारे सकळ ।
आयुष्य खातो काळ सावधान ।।

म्हणजेच मानवी देह हा नाशवंत असून क्षणोक्षणाने तो काळाच्या स्वाधीन होतो, आयुष्यातील सर्व सुखे, वेदना हे कोणालाच चुकत नाहीत आयुष्याचा शेवट हा एकदिवशी सर्वांचाच मृत्यूने होणार आहे हे निश्चित आहे.चांगले वागणे सत्कर्म करणे हे सर्वांनी अंगिकारले पाहीजे.कै.दादाभाऊ नामदेव मोरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

शब्दांकन -
**-ॲड.विनायक करकंडे**
**-प्रा.मच्छिंद्र राऊत**

सतकर्माच्या दिव्य फुलांनी । जीवन रचियेले ज्यांनी ॥
त्यांच्या आठवणी कायम राहतात मनी ॥
तुका म्हणे एक मरणेची सरे । उत्तमचि उरे कीर्ती मागे॥



||भावपुर्ण श्रध्दांजली||
कै.दादाभाऊ नामदेव मोरे
यांना रविवार दि.०८/०९/२०२४ रोजी देवाज्ञा झाली, त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

दशक्रिया विधी
मंगळवार दि.१७/०९/२०२४ रोजी सकाळी ०८ वाजता.
•प्रवचनकार:ह.भ.प.किरण महाराज चत्तर (शास्त्री)
•स्थळ:शेंडेश्वर मंदिर वडझिरे, ता.पारनेर, जि.अ.नगर

शोकाकुल
श्री.देवराम दादाभाऊ मोरे (मुलगा)
श्री.पोपट दादाभाऊ मोरे (मुलगा)
सौ.कमलबाई बाळासाहेब चौधरी (मुलगी)
सौ.हौसाबाई मारुती रेपाळे (मुलगी)
सौ.चंद्रभागा विष्णू निघुट (मुलगी)
श्री.वामन नामदेव मोरे (भाऊ)
श्री.महेश देवराम मोरे (नातू)
श्री.मयूर देवराम मोरे (नातू)
श्री.पंकज पोपट मोरे (नातू)
श्री.ऋषिकेश पोपट मोरे (नातू)
श्री.सोपान नाना मोरे (पुतण्या)
श्री.किसन नाना मोरे (पुतण्या)
श्री.सुभाष नाना मोरे (पुतण्या)
श्री.नामदेव वामन मोरे (पुतण्या)
श्री.शंकर वामन मोरे (पुतण्या)
श्रीम.अनिता रंगनाथ लंके (पुतणी)
श्री.भाऊसाहेब पांडुरंग मोरे (पुतण्या)
श्री.विजय पांडुरंग मोरे (पुतण्या)
श्री.शिवाजी पांडुरनग मोरे (पुतण्या)
सौ.जिजाबाई बबन ढवळे (पुतणी)
सौ.सोनाबाई सिताराम निघुट (पुतणी)
सौ.सुनिता गोरख रेपाळे (पुतणी)

•समस्त मोरे परिवार आप्तेष्ट नातेवाईक व समस्त ग्रामस्थ,वडझिरे•